म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क्र.



# नाटकांच्या गोष्टी ६

# मृच्छकटिक

IRBK-0108502

पु. रा. लेले

केशव भिकाजी ढवळे

3

दा. क्र. ८५०२

# नाटकांच्या गोष्टी

# मृच्छकटिक

गोविंद बल्लाळ देवल ह्यांच्या
'मृच्छकटिक' नाटकाची गोष्ट

पुरुषोत्तम रामचंद्र लेले

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ८५०२ नों. दि. ........
वि. ना. क्र. ........

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८३३९
विभाग ना.ल.वा.५५
क्रमांक २८८०
नोंद दि. २-२-५९

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0108502

मूल्य ७५ नये पैसे

© केशव भिकाजी ढवळे, १९६१

पहिली आवृत्ति : २६ जानेवारी १९६१

मुद्रक :
बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक :
बा. ग. ढवळे
केशव भिकाजी ढवळे,
चिराबाजार, मुंबई २

ग्रा. क्र. ८५०२
वि. ..ना..ना.

# नांदी

मृच्छकटिक हें मूळचें संस्कृत नाटक. त्याचे अंक दहा असल्यामुळें त्याला ‘ प्रकरण ’ म्हणतात. केवळ नाटक म्हणून पहावयाचें झाल्यास ‘ शाकुंतल ’ पेक्षां ‘ मृच्छकटिक ’ वरचढ ठरेल. शाकुंतलानें संस्कृत-भाषेला आणि नाटकांना जागतिक स्थान मिळवून दिलें यामुळें शाकुंतलाला अग्रेसरत्व द्यावें लागतें. शिवाय ‘ शाकुंतल ’ नाटकांत जें काव्य आहे त्याच्या मानानें मृच्छकटिकांत काव्य पुष्कळच कमी आहे. शाकुंतल लिहिणारा कवि माणसापेक्षां वरिष्ठ कोटींतला वाटतो. ‘ मृच्छकटिक ’ नाटक लिहिणारा कवि मनुष्यकोटींतलाच वाटतो.

मृच्छकटिक नाटकाचें मराठींत शब्दशः भाषांतर कै. परशुरामपंततात्या गोडबोले यांनीं केलें, तें प्रसिद्ध आहे. त्याचा बराचसा उपयोग करून कै. देवलांनीं ‘ संगीत मृच्छकटिक ’ तयार केलें. आणखी दोन लेखकांनीं मृच्छकटिक नाटकासाठीं पदें केलीं होतीं आणि तीं मुंबईच्या रंगभूमीवर म्हटलीं गेलीं होतीं. आतां त्यांचें कोणाला स्मरण आहे कीं नाहीं हें सांगणें कठीण. आज मृच्छकटिक नाटक जें मराठी जनतेपुढें आहे, तें देवलांचें ‘ संगीत मृच्छकटिक ’. म्हणून या पुस्तकांत अवतरणें आहेत तीं शक्यतों देवलांच्या पुस्तकांतून घेतलीं आहेत. अपवादात्मक अवतरणें तात्या गोडबोल्यांच्या भाषांतरांतून घेतलीं आहेत.

मृच्छकटिक नाटकाचा पसारा फारच मोठा आहे. त्याचा कर्ता शूद्रक राजा. त्यानें तत्कालीन समाजाचें सर्वांगीण चित्र या नाटकांत रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. यांत वरवर दिसणारें मुख्य कथानक म्हणजे चारुदत्त आणि वसंतसेना यांच्या प्रेमाचें; पण त्याच्या जोडीला नयप्रचार, व्यवहारदुष्टता, खलस्वभाव आणि भवितव्यता इतक्या गोष्टींचें चित्रीकरण या नाटकांत आहे.

मृच्छकटिकांत जितकें वैचित्र्य आणि विविधता आहे, तितकें वैचित्र्य व विविधता दुसऱ्या कोणत्याहि नाटकांत नाहीं. या दृष्टीनें पाहातां मृच्छकटिक जवळजवळ अद्वितीय आहे असें म्हणतां येईल.

या नाटकाचा विषय लोकांच्या रोजच्या अनुभवांतला आहे. सर्व पात्रें अशा तऱ्हेनें वागतात, कीं त्यांच्याबद्दल जिव्हाळा वाटतो. कोणीहि दंभ करून मोठेपणा मिळविण्याचा प्रयत्न करतांना दिसत नाहीं, त्यामुळें त्यांच्याबद्दल

बंधुभाव वाटतो. प्रेक्षकाला स्वत:बद्दल कमीपणा वाटावा असें कोणतेंहि कृत्य कोणीहि करीत नाहीं. कोणीहि सद्गुणांचा पुतळा नाहीं अथवा कोणीहि दुर्गुणांचा मूर्तिमंत पुतळा नाहीं. शकार हा दुर्गुणांचा पुतळा वाटतो, पण त्याचा अहंकार त्याला हास्यास्पद करतो आणि त्यामुळें तोहि संमिश्र माणूस वाटतो. नायक-नायिका तेवढे चांगले असें या नाटकांत दाखविलेलें नाहीं. समाजाच्या खालच्या थरांत चांगल्या गुणांचें वास्तव्य असतें असें या नाटकांत दाखविलेलें आहे. विट आणि चेट यांच्या अंगीं तर निष्पापबुद्धि आणि निष्ठा आहेतच, पण चांडाळां-मध्येंहि सहानुभूति आणि माणुसकी असते हें या नाटकांत दाखविलें आहे. 'आम्ही मारीत नाहीं, राजाज्ञा मारते' असें चांडाळ पुन: पुन: बजावून सांगतात.

'वध्यास फार यातना न होऊं देतां त्याचा शिरच्छेद करणें हा एक गुण आमच्या अंगीं आहे आणि शूलारोपण करण्याच्या कामीं कुशलता हा दुसरा' असें चांडाळ लोकांना सांगतात.

या नाटकांत राजाचा उल्लेख आहे, पण राजा प्रत्यक्ष प्रेक्षकांपुढें येत नाहीं. अखेरीस त्याचा लोकाग्रणीकडून वध झालेला दाखविला आहे. लोकांचें स्वयंभू सामर्थ्य यांत चित्रित केलें असल्यामुळें साहजिकपणें तें लोकांना आवडतें. 'माणसानें माणसांच्या रंजनाकरितां लिहिलेलें माणसांचें नाटक' असें मृच्छकटिकाचें वर्णन करतां येईल. कशाचाहि अभिनिवेश यांत नाहीं. औदार्याचाहि यांत अभिनिवेशानें डंका वाजविलेला नाहीं.

संगीत मृच्छकटिक प्रथम 'नाट्यानंद' नांवाच्या कंपनीनें रंगभूमीवर आणलें. त्यानंतर सहासात वर्षांनीं 'किर्लोस्कर संगीत मंडळी' नें त्याचे प्रयोग करावयास आरंभ केला. किर्लोस्कर कंपनीच्या प्रयोगांत भाऊराव कोल्हटकर चारुदत्ताचें काम करीत आणि त्यांच्या कामावरच लोकप्रियतेची सर्व मदार होती म्हटलें तरी चालेल. हें नाटक 'पाटणकर संगीत मंडळी'हि करीत असे आणि त्या कंपनींत शकाराचें काम 'शिवराम' नांवाचा नट करीत असे. याच्याइतकें चांगलें शकाराचें काम दुसऱ्या कोणींहि केलें नाहीं असें आपलें मत देवलांनीं स्वत: बोलून दाखविलें होतें. दत्तोपंत हल्याळकर चारुदत्ताची भूमिका करीत. शक्य तितकी भाऊरावांची नक्कल करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. किर्लोस्कर मंडळींत भाऊ-रावांच्या निधनानंतर चारुदत्ताची भूमिका कै. नारायण दत्तात्रेय जोगळेकर करीत. सन १९०६ पासून वसंतसेनेची भूमिका बालगंधर्व करूं लागले.

पु. रा. लेले



# गोविंद बल्लाळ देवल

गोविंद बल्लाळ देवल ह्यांचा जन्म सांगलीजवळ हरिपूर गांवीं ता. १३ नोव्हेंबर १८५५ रोजीं झाला. लोकमान्य टिळकांपेक्षां ते जवळजवळ नऊ महिन्यांनीं मोठे होते. ह्यांचें अण्णासाहेब किर्लोस्करांशीं गुरुशिष्याचें नातें होतें. देवल बेळगांवच्या सरदार हायस्कूल-मध्यें विद्यार्थी होते आणि किर्लोस्कर शिक्षक होते. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कुलांत ते नंतर दाखल झाले आणि मॅट्रिकच्या परिक्षेस ते राजाराम हायस्कूलचे विद्यार्थी म्हणूनच बसले. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर देवलांनीं बेळगांवच्या सरदार हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम केलें. कांहीं कारणानें ती नोकरी सोडून देवल कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींचे खाजगी शिक्षक म्हणून राहिले.

ती नोकरी सोडून देवल पुण्यास गेले आणि शेतकी कॉलेज-मध्यें शिकले. त्यांना त्या विषयाचा डिप्लोमा १८८४ सालीं मिळाला व पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची नोकरीही मिळाली. ही नोकरी त्यांनीं १८८७ सालीं सोडली आणि तेव्हांपासून लेखन ह्या एकाच व्यवसायास त्यांनीं स्वतःला वाहून घेतलें.

प्रथम 'पुणेंवैभव' ह्या वर्तमानपत्रांत स्फुट व राजकीय लेख त्यांनीं लिहिले व 'कादंबरीकलाप' ह्या मासिकाचें संपादन केलें. रेनॉल्ड्सच्या 'मिस्टरीज ऑफ लंडन' ह्या ग्रंथाच्या पहिल्या भागाचें भाषांतरही त्यांनीं केलें. पण त्यांचें मुख्य लिखाण म्हणजे नाटकें; आणि त्यांचें नांव चिरकाल टिकणार तें नाटककार म्हणूनच होय.

त्यांनीं १८८६ पासून १८९९ पर्यंत एकंदर सात नाटकें लिहिलीं. त्या नाटकांचीं नावें : ( १ ) दुर्गा, ( २ ) विक्रमोर्वशीय, ( ३ ) मृच्छकटिक, ( ४ ) झुंझारराव, ( ५ ) फाल्गुनराव, ( ६ ) शापसंभ्रम, ( ७ ) शारदा. ह्यांपैकीं दुर्गा, झुंझारराव, फाल्गुनराव हीं गद्य असून, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक, शापसंभ्रम व शारदा हीं संगीत नाटकें आहेत. 'फाल्गुनराव' ह्या नाटकांत संगीताची भर घालून 'संशयकल्लोळ' हें नाटक तयार करण्यांत आलें आणि तें रंगभूमीवर सन १९१६ सालीं आलें.

देवलांचीं पांच नाटकें अतिशय लोकप्रिय झालीं. फक्त 'विक्रमोर्वशीय' आणि 'दुर्गा' हीं नाटकें लोकप्रिय होऊं शकलीं नाहींत. 'संशयकल्लोळ' चे प्रयोग अलीकडेसुद्धा अनेक ठिकाणीं होतात. तसेंच 'शारदा' आणि 'मृच्छकटिक' ह्या दोन नाटकांचेही प्रयोग हल्लीं होतात. सात नाटकांत फक्त 'शारदा' हें एकच स्वतंत्र नाटक आहे. बाकींचीं भाषांतरें किंवा रूपांतरें आहेत.

देवलांनीं आपल्या प्रस्तावनेंत पुढील वाक्य लिहिलें आहे : " शेवटीं इतकें सांगणें अवश्य आहे कीं कै. परशुरामपंत तात्यांच्या भाषांतराचें मला बरेंच साहाय्य झालें."

देवल मिरज येथें ता. १४ जून १९१६ रोजीं मृत्यु पावले.

*　　　*　　　*

## मृच्छकटिक नाटकांतील पात्रें

चारुदत्त : एका श्रेष्ठ धनिक कुटुंबांतील गृहस्थ

मैत्रेय : चारुदत्ताचा मित्र

रोहसेन : चारुदत्ताचा मुलगा

शकार : अवंती नगरीचा कोतवाल आणि राजाचा मेहुणा

शकाराचा विट : सल्लागार ब्राह्मण

स्थावरक : शकाराचा गाडीवान व चेट

शर्विलक : कांहीं लोकांचा पुढारी व शास्त्रीय चोर

आर्यक : हा अखेरीस राजा होतो

कर्णपूरक : वसंतसेनेच्या नोकरींतील एक मल्ल

वर्धमानक : चारुदत्ताचा गाडीवान
— वसंतसेनेचा विट

वसंतसेना : एक सद्गुणी सद्वर्तनी वेश्या

मदनिका : तिची मैत्रीण

धूता : चारुदत्ताची पत्नी

रदनिका : चारुदत्ताच्या वाड्यांतील नोकर. वसंतसेनेची आई,
संवाहक, जुगारी, नगररक्षक, न्यायाधीश, मांग वगैरे

त्यांनीं १८८६ पासून १८९९ पर्यंत एकंदर सात नाटकें लिहिलीं. त्या नाटकांचीं नावें : ( १ ) दुर्गा, ( २ ) विक्रमोर्वशीय, ( ३ ) मृच्छकटिक, ( ४ ) झुंझारराव, ( ५ ) फाल्गुनराव, ( ६ ) शापसंभ्रम, ( ७ ) शारदा. ह्यांपैकीं दुर्गा, झुंझारराव, फाल्गुनराव हीं गद्य 'असून, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक, शापसंभ्रम व शारदा हीं संगीत नाटकें आहेत. ' फाल्गुनराव ' ह्या नाटकांत संगीताची भर घालून ' संशयकल्लोळ ' हें नाटक तयार करण्यांत आलें आणि तें रंगभूमीवर सन १९१६ सालीं आलें.

देवलांचीं पांच नाटकें अतिशय लोकप्रिय झालीं. फक्त ' विक्रमोर्वशीय ' आणि ' दुर्गा ' हीं नाटकें लोकप्रिय होऊं शकलीं नाहींत. ' संशयकल्लोळ ' चे प्रयोग अलीकडेसुद्धा अनेक ठिकाणीं होतात. तसेंच ' शारदा ' आणि ' मृच्छकटिक ' ह्या दोन नाटकांचेही प्रयोग हल्लीं होतात. सात नाटकांत फक्त ' शारदा ' हें एकच स्वतंत्र नाटक आहे. बाकीचीं भाषांतरें किंवा रूपांतरें आहेत.

देवलांनीं आपल्या प्रस्तावनेंत पुढील वाक्य लिहिलें आहे : " शेवटीं इतकें सांगणें अवश्य आहे कीं कै. परशुरामपंत तात्यांच्या भाषांतराचें मला बरेंच साहाय्य झालें. "

देवल मिरज येथें ता. १४ जून १९१६ रोजीं मृत्यु पावले.

* * *

# मृच्छकटिक नाटकांतील पात्रें

चारुदत्त : एका श्रेष्ठ धनिक कुटुंबांतील गृहस्थ

मैत्रेय : चारुदत्ताचा मित्र

रोहसेन : चारुदत्ताचा मुलगा

शकार : अवंती नगरीचा कोतवाल आणि राजाचा मेहुणा

शकाराचा विट : सल्लागार ब्राह्मण

स्थावरक : शकाराचा गाडीवान व चेट

शर्विलक : कांहीं लोकांचा पुढारी व शास्त्रीय चोर

आर्यक : हा अखेरीस राजा होतो

कर्णपूरक : वसंतसेनेच्या नोकरींतील एक मल्ल

वर्धमानक : चारुदत्ताचा गाडीवान

— वसंतसेनेचा विट

वसंतसेना : एक सद्गुणी सद्वर्तनी वेश्या

मदनिका : तिची मैत्रीण

धूता : चारुदत्ताची पत्नी

रदनिका : चारुदत्ताच्या वाड्यांतील नोकर. वसंतसेनेची आई,

संवाहक, जुगारी, नगररक्षक, न्यायाधीश, मांग वगैरे



रजनिनाथ हा नभीं उगवला



# रजनीनाथ हा नभीं उगवला

उज्जयिनी नगरी भारतांत अतिशय प्रसिद्ध होती व आहे. विक्रम संवत् ज्याच्या नांवें सुरू झाला त्याची राजधानी उज्जयिनी. ही नगरी विद्वत्ता आणि धन या दोहोंनींहि भरलेली होती. तरी सुद्धां एकादा वाईट राजा कांहीं काल उज्जयिनी नगरीच्या नशिबीं येत असे. असा वाईट राजा राज्य करूं लागला म्हणजे तो मंत्री वाईटच निवडतो, राज्याचा बंदोबस्त करण्याचें कामहि वाईट लोकांच्याच हातीं जातें. राजसत्ता ज्यांच्या हातीं तेच असे बिघडले म्हणजे त्यांच्या हस्तकांचें प्राबल्य सुरू होतें. उद्योगाला महत्त्व राहात नाहीं. छानछोकी, रंगढंग, चैन, विलास, जुगार वगैरेंना भरपूर वाव मिळतो. जुगारी लोकांचे अड्डे बनतात आणि त्यांच्यांत पक्ष बनतात. अधिकारी लोकांना यांच्यापासून पैशाचा लाभ होतो. जुगारी लोक आपल्या सुरक्षिततेबद्दल बेफिकीर असतात; त्यामुळें त्यांच्या अंगीं बेडरपणा व साहस हे गुण निर्माण होतात आणि वाढीस लागतात. त्यांच्या वाटेस कोणी जाऊं शकत नाहीं, इतके ते मस्त होतात.

उज्जयिनी नगरींत ज्या वेळीं पालक नांवाचा राजा राज्य करीत होता, त्या वेळीं अशीच परिस्थिति निर्माण झाली होती. यानें अन्यायाच्या मार्गानें राज्य मिळवलें होतें असें दिसतें. गादीवर बसल्यानंतर गादीवरील आपला हक्क सामान्य लोकांनीं मान्य करावा म्हणून त्यानें यज्ञयाग करावयास सुरुवात केली. मात्र उज्जयिनी नगरीचा बंदोबस्त त्यानें आपल्या पूर्ण विश्वासांतील माणसाच्या हातीं ठेवला होता. या अधिकाऱ्याचें नाटकांतील नांव 'शकार' असें आहे. तो संस्थानक म्हणून ओळखला जात होता. त्याचें खरें महत्त्व तो शहरचा कोतवाल होता म्हणून नव्हतें, तर तो पालकराजाचा मेहुणा होता, यामुळें त्याचा दरारा बसला होता. राजाचा मेहुणा म्हणजे राजमहिषी किंवा पट्टराणी त्याची बहीण होती असा नव्हे. शकाराची बहीण पालकराजाच्या अनेक राण्यांपैकीं एक होती इतकेंच. पण ती सुंदर होती म्हणून राजाची ती कांहीं वर्षें तरी आवडती राणी असली पाहिजे. तिच्या सांगण्यावरून म्हणा, किंवा स्वतंत्रपणें आपल्याला हवा तसा शहराचा बंदोबस्त शकार ठेवील असें पालकराजाला वाटलें म्हणून म्हणा, त्याला राजानें नगरकोतवाल नेमलें हें खरें.

असला माणूस पालकराजाचें हित पाहूं शकला तरी लोकांना त्याचा कारभार हितकर होईलच असें नाहीं. शकार हा स्वतः सचोटीचा, निर्व्यसनी व लोकांचें हित पाहाणारा असता, तर त्याचा कारभार लोकांना कल्याणकारी झाला असता. दुर्दैवानें अशीं माणसें क्वचितच चांगलीं असतात. शकार बुद्धिमान् होता अशांतलासुद्धां भाग नाहीं, पण कारस्थानांत तो तरबेज होता हें मात्र खरें. गांवांतील

ग्रंथ संग्रहालय,

जुगाऱ्यांशीं त्याचा चांगला परिचय होता आणि कृष्णकृत्यें करणारांचीहि त्यानें ओळख करून घेतली होती.

निरलसपणें एकादा धंदा करून व्यवस्थित संसार करण्याची वृत्ति सगळ्यांच्या अंगीं असते असें नाहीं. बुद्धिमान् माणसाच्या अंगीं अशा वृत्तीचा अभाव असला म्हणजे तो साहसाचीं कामें करण्याकडे आपल्या बुद्धीचा उपयोग करतो. साहसी मनुष्य वाईट प्रवृत्तीचा किंवा पापी असतो असें नाहीं. त्याच्यासंबंधीं एवढेंच निश्चित असतें, कीं त्याला मार्गांबद्दल विधिनिषेध नसतो. असा एक इसम 'शर्विलक' या नांवानें उज्जयिनी नगरींत वास करीत असे. हा मूळचा ब्राह्मण. थोडेंफार पठण त्यानें केलें असलें पाहिजे. तो चोरीचें शास्त्र शिकला होता व कार्तिकस्वामी हें त्याचें दैवत होतें. याला माणसांचें धार्जिणें होतें. पुरोहिताचा किंवा शिक्षकाचा पेशा त्याच्या साहसी वृत्तीला मानवला नाहीं, म्हणून आपलें गांव टाकून आपलें नशीब पाहाण्यासाठीं तो उज्जयिनी नगरींत येऊन राहिला होता. जुगाऱ्यांचे अड्डे असतात, तसे गटहि असतात. सरकारी अधिकाऱ्यांशीं सूत जमविणारांचा एक पक्ष असतो, त्यांच्याशीं विरोध करणारांचा दुसरा पक्ष असतो. उज्जयिनी नगरींतला जो सरकारविरोधी गट होता त्यांचा अनभिषिक्त पुढारी हा शर्विलक होता.

आर्यक हा शर्विलकाचा मित्र होता. गादीचा खरा वारस आर्यक, असें पुष्कळ लोक मानीत होते. एका सिद्ध पुरुषानें तर आर्यक राजा होणार असें भविष्य वर्तविलें होतें. त्यामुळें त्याचा नायनाट करावयास पालक राजा टपलेला होता. त्याचें पालकापासून रक्षण

करण्याकरितां त्याला गवळी वस्तींत राहावयास लाविलें होतें. कंसापासून स्वतःला बचावण्याकरितां कृष्णाला गोकुळच्या गवळी-वस्तींतच राहावें लागलें होतें हें सर्वांना माहीत आहेच. गवळी लोक नेहमींच आपल्या धंद्याकरितां राजधानीच्या शहरीं जात असत आणि आर्यकाला राजधानींत वारे कसे वाहातात हें समजत असे.

राजधानींत बंदोबस्त यथातथाच होता. शकाराची भीति सर्वांना वाटे, पण त्याच्याबद्दल आदर किंवा आपलेपणा मुळींच वाटत नव्हता. लोक उघडपणें जुगार खेळत आणि आपल्या देण्याघेण्याचा व्यवहार जुगारी पुरुष कोर्टकचेरींत नेत नव्हते. त्यांचा कायदा दांडगाईचा होता आणि शकार तिकडे दुर्लक्ष करीत असे. कदाचित् निरनिराळ्या गटांकडून तो हप्ते घेत असेलहि. जुगारी लोक कोणत्याहि उलथापालथींत पुढाकार घ्यावयास आपल्या बेडर वृत्तीमुळें लायक असतात आणि साहसाच्या आवडीमुळें तयार असतात. उद्यांचा विचार त्यांच्या साहसी वृत्तीला आळा घालीत नाहीं. जुगारी आपण होऊन राजकारणाच्या भानगडींत पडत नाहींत, पण एखाद्या शर्विलकाच्या नेतृत्वाखालीं कांहीं उलथापालथ करावयास मात्र एका पायावर तयार असतात.

शर्विलकाचें 'मदनिका' नांवाच्या एका सुंदर मुलीवर प्रेम होतें. ती ब्राह्मण नव्हती, म्हणून आईबापांच्या संमतीनें तिच्याशीं लग्न करणें शर्विलकाला शक्य नव्हतें. तिच्या आईबापांनीं म्हणा अगर पालनकर्त्यांनीं म्हणा, तिला एका श्रीमंत वेश्येला विकून टाकली होती. गरिबीमुळें त्यांना विकून टाकणें भाग पडलें असेल किंवा पैशाच्या मोहानें त्यांनीं तिला विकली असेल. तिला सोडवून तिला आपली स्त्री करावी हा शर्विलकाचा उद्देश होता.

शर्विलकाचा आणखी एक मित्र होता आणि तो उज्जयिनी नगरीचा कायम रहिवासी होता. त्याचें नांव रेभिल. हा रेभिल व्यापारी असून गोड गळ्याचा, लोकप्रिय गायक होता. गाड्या ठेवून मालाची नेआण करण्याचा त्याचा धंदा होता. त्याचें गाणें ऐकण्यास सर्व दर्जांचे आणि सर्व व्यवसायांचे लोक येत असत. गाडीवानांना त्याचें घर माहीत होतें. वेश्यांच्या मुलींना तो गाणें शिकवीत असे.

ज्या वेश्येनें मदनिकेला विकत घेतलें होतें तिला वसंतसेना नांवाची अत्यंत सुंदर अशी एकुलती एक मुलगी होती. आपला पिढीजाद् धंदा तिनें चालवावा आणि आधींच गडगंज असलेल्या संपत्तींत आणखी भर घालावी अशी आईची इच्छा होती. त्या दृष्टीनें तिनें वसंतसेनेचें शिक्षणहि केलें होतें. पण वसंतसेनेची वृत्ति अगदीं निराळी होती. वेश्याव्यवसाय तिला मुळींच पसंत नव्हता आणि घरांत इतकी संपत्ति होती, कीं तिला तो व्यवसाय करण्याची मुळींच आवश्यकता नव्हती.

वसंतसेना शकाराच्या दृष्टीस पडल्यापासून ती त्याला हवीशी वाटूं लागली होती आणि तिला वश करण्याकरितां सर्व प्रकारचे उपाय तो योजीत होता. वसंतसेनेच्या आईच्या मनांतून शकाराला थारा द्यावा आणि अशा प्रकारें राजाचा सत्ताधारी मेहुणा आपल्या मुठींत यावा असेंच होतें. पण वसंतसेनेच्या इच्छेविरुद्ध जाण्या-इतकी तिची आई क्रूर किंवा स्वार्थी नव्हती. पैसा किंवा अधिकार यांच्या जोरावर वसंतसेना वश होत नाहीं असें शकाराला दिसलें, तेव्हां तिच्या हालचालींवर पाळत ठेवून तिला पळवून नेण्याचा

त्यानें घाट घातला. वसंतसेना एकटी-दुकटी कुठें जात नसे. पण वडील माणसांसारखा तिला अनुभव नव्हता.

एका संध्याकाळीं वसंतसेना फक्त तीनचार स्त्रीसेविकांना घेऊन देवदर्शनाला गेली. त्या वेळीं शकारानें तिच्यावर पाळत ठेवली. सूर्य मावळला आणि आकाश ढगांनीं एकदम भरून आलें. वसंतसेनेपासून तिच्या दासी दुरावल्या आणि ती एकटी एका बाजूस पडली. अशा तिच्या अवस्थेंत शकारानें आपल्या परिवारासह तिच्यावर झडप घालण्याचा प्रयत्न केला. तिनें निसटून जाण्याचा प्रयत्न केला, पण तीन जणांच्या कचाट्यांतून सुटणें जवळ जवळ अशक्य होतें. शकार व त्याच्या बरोबरचे विट आणि चेट तिचें मन वळवूं लागले.

विट :

नृत्ययोग्यचि मृदु चरण असुनि त्यांसी ।
धावण्याचे कष्ट कां व्यर्थ देसी ।
हरिणि जैसी लागतां व्याध मागें ।
अम्हां पाहुनि तूं पळसि तविं कां गे ॥

शकार : अगे वशंतशेने, उभी रहा. जर माझ्यावर शुप्रशन्न झालीश तर मरायची नाहींश. रात्रीं शुश्कारे शोडीत शय्येवर पडतों, पण श्रमांत शुद्धां बघ झोंप येत नाहीं. म्हणून रावणाला जशी कुंती वश झाली, तशी तूं माझ्यावर शुप्रशन्न हो गे. वशंतशेने, तूं कशी शुरेख मदनाची छडी आहेश, चोर आहेश, शुवशना आहेश आणि तुझें नाक कशें चपटें आहे.

विट : वसंतसेने, उभी रहा. आमच्यापुढं किती बरं पळशील ?

शकार : मित्रा विटा, हिच्या भूषणांचा झणझण खणखण अशा गोड आवाज ऐकूं येतो नाहीं बरें ? वशंतशेने, रामाला भिऊन जशी द्रौपदी पळाली तशी तूं मला भिऊन पळून जातेश काय ?

विश्वावशूची भगिनी शुभद्रा । नेली जशी मारुतिनें शमुद्रा ॥
तशी तुला मी धरितों पहा गे । जातीश कोठें फिर शीघ्र मागें ॥

अगे, वशंतशेने, रानांत जशे कुत्रे कोल्हीच्या पाठीश लागतात, तशे आम्ही तुझ्या पाठीश लागलों अशतां तूं माझें हृदय चोरून पळून जातेश काय ?

**वसंत०** : पल्लविके, परभृतिके ! अगबाई, कोणीच जवळ नाहीं ! या दासी चुकल्या वाटतं. आतां माझं मलाच रक्षण केलं पाहिजे असं झालं.

**शकार** : वशंतशेने, पल्लविकेश हाका मार, परभृतिकेश हाका मार, पाहिजे तर शाऱ्या वशंतमाशाला हाका मार, पण मी तुझ्या पाठीश लागलों अशतांना तुला कोण शोडवतो पाहूं.

तो भीम तो कीं जमदग्निपुत्र । कीं येउ कुंतीसुत पंचवक्त्र ॥
तुझा पहा मी बुचडा धरीतों । दुःशाशनाची करणी करीतों ॥

वशंतशेने, अशी जर धडपडलीश तर या तीक्ष्ण तरवारीनें तुझी मानच कापीन बघ. अगे, अशी भिऊं नकोश. अशी घाबरूं नकोश. मुकाट्यानें वश हो.

वसंतसेनेशीं ते तिघे लगट करणार, इतक्यांत ढग इतके घनदाट भरून आले कीं त्यांना ती दिसेनाशी झाली. तिला नकळत ती एका घराच्या मागील दाराशीं आली. शकाराला तें घर चारुदत्ताचें आहे हें माहीत होतें आणि सहजीं त्यानें तसें विटाजवळ बोलून दाखवलें. वसंतसेनेनें तें ऐकलें आणि तिला आनंद झाला. कारण तिचें चारुदत्तावर प्रेम बसलें होतें.

वसंतसेनेच्या सुदैवानें तें दार उघडलें. सूर्यास्तानंतरचा बलि देण्याची ही वेळ होती आणि चारुदत्ताच्या घरांतील बलि रस्त्यावर ठेवण्याकरितां चारुदत्ताचा मित्र मैत्रेय व दासी रदनिका त्या दारानें बाहेर पडत होतीं. रदनिकेच्या हातांत दिवा होता, त्याची ज्योत आपल्या पदरानें वसंतसेनेनें विझवली आणि अंधाराचा फायदा घेऊन तिनें चारुदत्ताच्या घरांत प्रवेश केला. या एका

कृतीनें तिनें दोन कामें साधलीं. एक तर शकाराच्या कचाट्यांतून तिची सुटका झाली आणि दुसरें म्हणजे तिच्या प्रियकराच्या सहवासाचा अनायासें लाभ झाला. तें घर चारुदत्ताचें आहे असें तिला स्वतःला या वेळपर्यंत माहीतसुद्धां नव्हतें.

वसंतसेना घरांत गेली, पण रदनिका बाहेर राहिली. तिला शकारानें पकडली आणि वसंतसेनाच आपल्या हातीं लागली असें त्याला वाटलें. ती ज्या वेळीं मैत्रेयाला मोठमोठ्यानें हाका मारूं लागली, त्या वेळीं त्याच्या लक्षांत आपली चूक आली. नंतर ते निघून गेले.

वसंतसेना वाड्यांत गेली आणि चारुदत्त ओसरीवर बसला होता त्याच्या शेजारीं जाऊन उभी राहिली. चारुदत्त अंधारांत बसला होता, त्यामुळें ती रदनिका आहे असेंच तो समजत होता. रोहसेन नांवाचा त्याला एक मुलगा होता, तो झोंपला होता. त्याला थंडी लागूं नये म्हणून त्याच्या अंगावर घालण्याकरितां आपला शेला चारुदत्तानें वसंतसेनेच्या अंगावर टाकला. वसंतसेना त्या घराला अगदीं परकी होती, म्हणून जागच्याजागीं उभी राहिली.

**चारुदत्त :** रदनिके, रोहसेनाला माजघरांत घेऊन जा असें मीं तुला सांगितलें तें ऐकलें नाहींस वाटतें ?

**वसंतसेना :** ( स्वगत ) आंत जावें इतकें कोठें आहे माझें भाग्य !

**चारुदत्त :** रदनिके, मी बोलतों त्याचें उत्तरसुद्धां देत नाहींस ना ? शिवशिव ! माझाच काळ फिरला, तुझ्याकडे काय दोष ?

होतां भाग्य क्षीण नराचें, मित्रहि अमित्र होती ।
चिरानुरतही जे जन, त्यातें जाणुनि अवमानीती ।
देती तद्वचना । प्रतिवच नच, ते कष्ट मना ॥

मैत्रेय : मित्रा, ही तुझी रदनिका संभाळ कशी.

चारु० : काय ही रदनिका ? तर मग ती कोण ? कोणी परस्त्री वाटतें ? शिवशिव ! मीं पांघरलेलें वस्त्र न समजतां तिच्या अंगावर टाकलें, त्यामुळें ती दूषित झाली असेल !

वसंत० : दूषित नाहीं पण भूषित मात्र झाली.

मैत्रेय : मित्रा, परस्त्रीची शंका नको. अरे, कामदेवाच्या उत्सवापासून तुझ्यावर अनुरक्त झालेली वसंतसेना ही !

चारु० : काय वसंतसेना ही ! सेवकजनाला जें काम सांगायचं, तें नकळत मीं तुला सांगितलं हा माझा अपराध झाला. मला क्षमा कर.

मैत्रेय : मित्रा, राजशालक शकाराचा तुला कांहीं निरोप आहे.

चारु० : तो कोणता ?

मैत्रेय : ऐक. तो म्हणाला : धनकनकसंपन्न अशी जी कलावंतिणीची पोरगी वसंतसेना, ती कामदेवाच्या उत्सवापासून तुझ्यावर अनुरक्त झाली आहे. आम्ही बलात्कारानें तिला वश करीत असतांना ती तुझ्या घरांत शिरली. ती जर मुकाट्यानें माझ्या स्वाधीन करशील तर सरकारांत गेल्याशिवाय माझा खटला तूंच संपविलास असें होऊन मी तुझ्यावर कृपा करीन; आणि तसें जर न करशील तर मरेपर्यंत तुझें आणि माझें वैर राहील.

चारु० : ऊः ! तो मूर्ख आहे.

वसंत० : महाराज आपली मजवर पूर्ण कृपा असेल तर माझी एक विनंती आपण मान्य करावी. हे माझे दागिने सांभाळावे, कारण त्यांच्या पायीं त्या दुष्टांनीं माझी पाठ पुरविली आहे. म्हणून म्हणतें, हे आपण सांभाळावे.

चारु० : मैत्रेया, तेवढे अलंकार घे पाहूं.

मैत्रेय : वसंतसेने, तुझें कल्याण असो.

चारु० : अरे तिनें तुला कांहीं धर्म नाहीं केला, ठेव ठेविली आहे.

मैत्रेय : तर मग चोर का नेईनात.

चारु० : आणि थोड्याच दिवसांनीं—

मैत्रेय : ही ठेव—

चारु० : ती परत घेऊन जाईल. हे दागिने दिवसां वर्धमानकानें सांभाळावे आणि रात्रीं तूं सांभाळावे, समजलास ? लोकांचे आहेत, ठेव आहे, नीट सांभाळ.

वसंत० : आपली आज्ञा होईल तर मैत्रेयाला घेऊन मी घरीं जाईन म्हणतें.

चारु० : बरें आहे. मैत्रेया, जा, हिला पोंचवून ये.

मैत्रेय : नाहीं नाहीं, मी नाहीं जाणार, आपणच जावें. या कलहंसगामिनीच्या मागें आपण गेलांत म्हणजे राजहंसाप्रमाणें शोभाल.

चारु० : बरं आहे, मी जातों. राजमार्गांत मनुष्याची स्पष्ट ओळख पटण्यासारखी मशाल लावायला सांग.

मैत्रेय : वर्धमानका, दिवटी पेटव पाहूं.

वर्ध० : महाराज, घरांत तेलाचा एक थेंब नाहीं, आणि दिवटी कसली पेटवूं?

चारु० : अरे, दिवटी नको. कारण, हा पहा—

रजनिनाथ हा नभीं उगवला। राजपथीं जणुं दीपचि गमला। ध्रु०।
नवयुवतीच्या निटिलासम किति। विमल दिसे हा ग्रहगण भोंवति।
शुभ्रकिरण घन तिमिरीं पडती। पंकीं जेंवि पयाच्या धारा॥

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 6402 नों. दि ..........
वि. ...ना. ना. क्र. ..................



# शाखा सद्गुण जया

चारुदत्त हा राजधानींतील एका प्रमुख श्रेष्ठी घराण्यांत जन्मला आणि त्याचा वाडा श्रेष्ठीचत्वारांत होता. त्याच्या आज्याचें नांव विनयदत्त आणि त्याच्या बापाचें नांव सागरदत्त. हें घराणें सावकारी करणारें होतें आणि प्रामाणिकपणाबद्दल नांवाजलेलें होतें. त्या घराण्याचें राजदरबारीं वजन होतें आणि लोकांतहि त्याच्याबद्दल आदर वास करीत होता. अशा संपन्न घरांत चारुदत्ताचा जन्म झाला. तो स्वभावानें अतिशय दिलदार आणि लोकांशीं वागण्यांत अतिशय उदार होता. मैत्रेय हा त्याचा पिढीजाद मित्र होता. धंदा चालविण्यांत चारुदत्त यशस्वी होता असें म्हणतां येणार नाहीं. औदार्यामुळें त्याला लोकप्रियता पुरेपूर प्रमाणांत मिळाली, पण धनसंचयाला मात्र गळती लागली. वेळीं मशालीला लागणारें तेलहि घरांत नसावें अशी त्याच्या घराची अवस्था झाली. नोकराचाकरांचा तांडा त्याच्या घरांतून निघून गेला होता. मैत्रेय, वर्धमानक

आणि रदनिका हीं तीन माणसें मात्र निष्ठेनें त्याच्याजवळ राहिलीं होतीं.

चारुदत्ताच्या घरीं अगदीं आकस्मिकपणें वसंतसेना प्रविष्ट झाली आणि त्याच्या सोबतीनें आपल्या घरीं गेली. त्या रात्रीनंतरच्या सकाळीं वसंतसेना आपल्या मैत्रिणीजवळ, म्हणजे मदनिकेजवळ आपल्या मित्राबद्दल सहजच बोलत होती. त्याचें नांव ती सांगेना आणि मदनिकेला तर तें नांव समजून घेण्याची तीव्र इच्छा होती. आडवळणानें बोलत असतांना वसंतसेना नांव न घेतां चारुदत्ताचें वर्णन करूं लागली.

वसंतसेना : जो या नगरा भूषण खरा । जैसा भाळीं शोभे हिरा ॥
ज्याच्या सद्गुणगानीं गिरा । रंगली सुजनांची ॥ १ ॥
निर्धन असतां धनदापरी । औदार्यातें अंगीं धरी ॥
दुर्दैवानें छळिलें तरी । शील न सोडी जो ॥ २ ॥
करि जो दीनावरती दया । लोकीं वागे पाहुनि नया ।
वाहिली ही मीं काया तया । निर्मल भावानें ॥ ३ ॥

मदनिका : कुसुमसमय संपतां तरूचा । मधुकरि करि कां आश्रय ॥
त्याचा ॥ ध्रु० ॥
प्रियजन तुमचा निर्धन झाला । काय असे तो कामाचा ॥

वसंतसेना : धनहीन असा होय सखे म्हणुनि त्यावरी ।
जडलें मम मानस हें जाण झडकरी ॥ ध्रु० ॥
मजसम ज्या असति जगीं वारयोषिता ।
त्यांनिं सधन पुरुष बघुनि त्यासि सेवितां ।
लोभी हें दूषण जन देति तत्त्वतां ।
होइल तें सहन कसें सांग अंतरीं ॥

हा संवाद चालला असतां एक जुगारी धावऱ्या धावऱ्या त्या दिवाणखान्यांत आला. तो जुगारांत हरला होता आणि त्यानें जें देणें द्यावयाचें होतें तें वसूल करण्याकरितां जिंकणारे जुगारी त्याच्या मागें लागले होते. त्याला थोडा मारहि मिळाला होता. त्यांच्यापासून आपलें रक्षण व्हावें या आशेनें तो वसंतसेनेच्या मोठ्या वाड्यांत शिरला. वाड्यांत शिरण्याची दुसऱ्या जुगाऱ्यांची हिंमत नव्हती, पण ते वाड्याच्या दरवाज्यावर पाळत ठेवून उभे राहिले होते.

त्याच्यावर कोणतें संकट आलें आहे याची चौकशी वसंतसेनेनें केली आणि त्यानें जेवढें धन द्यावयाचें होतें तेवढ्या किमतीचें एक सुवर्णकंकण वसंतसेनेनें मदनिकेकरवीं त्या यशस्वी जुगाऱ्यांच्या हवालीं केलें. ते निघून गेले आणि संकटग्रस्त जुगाऱ्याला वसंतसेनेनें बसावयास सांगितलें.

हा जुगारी मूळचा संवाहक होता आणि चारुदत्ताच्या घरीं राहिला होता. चारुदत्ताची संपत्ति नष्ट झाल्यावर त्याला तें घर सोडावें लागलें. त्या संवाहकाला मनाजोगा दुसरा यजमान मिळाला नाहीं म्हणून म्हणा किंवा अन्य कारणानें म्हणा, तो उदरनिर्वाहासाठीं जुगाराकडे वळला. पण जुगारांत दैवानें त्याला हात दिला नाहीं आणि तो या आपत्तींत सांपडला. ही त्याची हकीकत ऐकतांच वसंतसेनेनें त्याला उच्चासनावर बसविलें आणि त्याला वारा घालण्याची मदनिकेला आज्ञा केली. चारुदत्ताची त्यानें सेवाचाकरी केली होती, म्हणून वसंतसेनेनें त्याला इतक्या सन्मानानें वागविलें. पाहुणचार संपल्यावर तो संवाहक जाऊं लागला, पण जाण्यापूर्वीं आपली कला वसंतसेनेच्या पदरीं असणाऱ्या कोणा तरी नोकराला शिकविण्याची त्यानें

इच्छा प्रदर्शित केली. 'ज्याची पूर्वीं सेवा करीत होतां, त्याचीच यापुढेंहि चालू ठेवा' असें वसंतसेनेनें त्याला उत्तर दिलें.

या उत्तरानें त्याला विषाद वाटला आणि संन्यास घेण्याचा मानस त्यानें तिला सांगितला. लगेच त्यानें संन्यास घेतलासुद्धां आणि 'नमो बुद्धाय' म्हणत तो बाहेर पडला.

तो बाहेर पडून रस्त्यावर जातो तोंच वसंतसेनेचा 'स्तंभभंजक' नांवाचा हत्ती मस्त होऊन त्याच रस्त्यावर आला आणि यति झालेल्या त्या संवाहकाला सोंडेनें उचलूं लागला. त्याच्या सुदैवानें वसंतसेनेच्या पदरीं असलेला कर्णपूरक नांवाचा एक पहिलवान त्या ठिकाणीं आला आणि त्यानें हत्तीला शांत केलें. यति जिवंत राहिला. त्या वेळीं ती घटना पाहावयास जी गर्दी लोटली, त्या गर्दींत चारुदत्त होता, त्यानें आपल्या अंगावरचा शेला कर्णपूरकाला बक्षीस दिला. तो शेला कर्णपूरकानें वसंतसेनेस दाखविला. वसंतसेनेनें तो शेला चारुदत्ताचा असल्याचें ओळखलें आणि तो मागून घेतला. त्याच्या बदली वसंतसेनेनें कर्णपूरकाला सुवर्णकंकण दिलें. रस्त्यानें चारुदत्त जात असतांना कदाचित् त्याचें दर्शन होईल या आशेनें मदनिकेसह वसंतसेना आपल्या माडीवर गेली.

या घटनेनंतरच्या रात्रीं रेभिलाकडे गाण्याची मैफल होती. चारुदत्त रेभिलाचा मित्र तर होताच, शिवाय चारुदत्त सुस्थितींत असतांना रेभिलाचा मोठा आश्रयदाता होता. चारुदत्ताबरोबर मैत्रेय तर होताच, पण अन्य रसिकहि तेथें होते. त्यांत चारुदत्ताच्या आसपास राहाणारे सावकार लोकहि होते. मैफल मध्यरात्रीपर्यंत चालली होती. ती संपल्यावर चारुदत्त व मैत्रेय घरीं परतले. पण चारुदत्ताचें मन रेभिलाच्या ललकाऱ्यांतच रंगलेलें होतें. हातपाय धुऊन



वसंतसेनेनें तो शेला ओळखला—

दोघेहि झोपले. झोपीं जाण्यापूर्वीं मैत्रेयाला वर्धमानकाजवळून वसंतसेनेच्या दागिन्यांची गांठोडी संभाळण्यासाठीं घ्यावी लागली. त्याला असल्या जबाबदारीची संवय नव्हती. त्यामुळें तो म्हणाला, "ह्या उज्जयिनी नगरींत कोणी चोर नाहींत काय, कीं एकहि रांडलेक ह्या निद्रा चोरणाऱ्या धनाला चोरून नेत नाहीं!" असें म्हणून मैत्रेय निद्रेच्या आधीन झाला.

शर्विलक मदनिकेला सोडवावयास अतिशय उत्सुक होता. उद्योगधंदा करून जरूर ती रक्कम उभी करतां येईना म्हणून नाइलाजानें त्यानें निश्चय केला, कीं कोणातरी श्रीमंताच्या घरांत चोरी करावी आणि अवश्य तेवढें धन मिळवावें. तो धंदेवाईक चोर नव्हता, पण अडचणींत सांपडल्यावर मनुष्य काय करील हें सांगवत नाहीं. कबीर व कमाल यांच्यासारख्या साधुपुरुषांनीं सुद्धां चोरी केली असें सांगण्यांत येतें.

सावकारचौकांत तो मध्यरात्रीं येऊन ठेपला आणि ज्या घरांत अंधार दिसला त्या घरांत चोरी करण्याचें त्यानें ठरविलें. हें घर चारुदत्ताचें होतें. सदन भव्य होतें. भिंतीला शास्त्रीय पद्धतीनें भोंक पाडून शर्विलक आंत शिरला. त्याला झोपलेला मैत्रेय आणि त्याच्या आसपास तंबोरा, तबला व इतर गायनाचीं वाद्यें दिसलीं, तेव्हां त्याची निराशा झाली. इतक्यांत अर्धवट झोपेंत असलेला मैत्रेय म्हणाला, 'मित्रा, घरांत चोर शिरलासें वाटतें. तर हे दागिने आपल्या ताब्यांत घे.' तेव्हां शर्विलकाला ते दागिने दिसले आणि ते घेऊन तो निघून गेला.

रदनिकेला चोराची चाहूल लागली आणि तिनें आरडाओरड करून सर्वांना जागें केलें. नंतर आढळून आलें, कीं मैत्रेयाजवळ ठेवलेले दागिने चोरानें नेले. हे दागिने ठेव म्हणून ठेवलेले असल्यामुळें चारुदत्ताला मोठी चिंता वाटूं लागली. दारिद्र्यामुळें चारुदत्तानें दागिन्यांचा अपहार केला आणि चोरीचा खोटाच बोभाट केला असें लोक म्हणतील, या विचारानें त्याला पछाडलें. या सगळ्या प्रकाराची जाणीव त्याच्या 'धूता' नांवाच्या पत्नीला झाली आणि आपल्या गळ्यांतील बहुमोल रत्नमाला तिनें मैत्रेयाच्या स्वाधीन केली. त्यानें ती चारुदत्तास दिली. ती हातांत पडतांच चारुदत्त म्हणाला, 'ही रत्नमाला घेऊन आतांच वसंतसेनेकडे जा आणि तिला माझा निरोप सांग, कीं जे सुवर्णालंकार माझ्यापाशीं दिले होतेस ते माझेच असें समजून मीं द्यूतांत हरविले. त्यांचा मोबदला म्हणून ही रत्नमाला तुझ्याकडे पाठविली आहे. तर कृपा करून हिचा स्वीकार कर.'

मोठ्या नाखुषीनें मैत्रेयानें तें काम अंगावर घेतलें. भिंतीला पडलेलें भोंक लोकांना दिसूं नये म्हणून भिंतींतून काढलेल्या विटांनींच तें वर्धमानकाकडून चारुदत्तानें बुजवून घेतलें.

त्या रात्रीनंतरच्या सकाळीं शर्विलक ते चोरलेले दागिने घेऊन वसंतसेनेच्या घरीं गेला आणि मदनिकेला त्यानें गांठलें. 'हे दागिने घेऊन वसंतसेना तुला मुक्त करील का' असें त्यानें मदनिकेला विचारलें.

**मदनिका :** शर्विलका, ही गोष्ट मीं एक वेळ ताईसाहेबांना विचारली होती. त्या वेळीं त्या म्हणाल्या, मी जर स्वतंत्र असतें तर द्रव्य घेतल्यावांचून सर्व दासी-

जनांना सोडलें असतें. पण काय करूं ? धनीपणा पडला आईकडे. तेथें माझें कांहीं चालत नाहीं. बरें पण शर्विलका, मला सोडवून नेण्यापुरतें द्रव्य तुझ्याजवळ कुठें आहे ?

शर्विलक : त्यासंबंधीं मीं कांहीं तजवीज केली आहे ती तुला सांगतों.

दारिद्र्यानें जरि पीडित मी तव रूपीं हें जडलें ।
मानस माझें यास्तव रात्रीं कांहीं साहस केलें ।
लाभ तुझा व्हाया । हा तव दासपणा जाया ॥

शर्विलकानें गांठोडींतील दागिने मदनिकेला दाखवितांच तिनें ते ओळखले. त्या दागिन्यांसंबंधींची सर्व हकीकत ऐकतां शर्विलकाला वाईट वाटलें आणि काय करावें हें त्याला सुचेना. तेव्हां मदनिकेनें त्याला सुचविलें, 'हे दागिने चारुदत्तानें पाठविले आहेत असें सांगून तूंच हे वसंतसेनेला दे.' प्रथम शर्विलक कांकूं करूं लागला, पण मदनिकेनें आश्वासन देतां त्यानें तसें करण्याचें कबूल केलें. ठरवलेले शब्द बोलून शर्विलकानें दागिने वसंतसेनेच्या हवालीं केले आणि घाईघाईनें तो जाऊं लागला. मदनिका व शर्विलक एकमेकांवर अनुरक्त आहेत असें वसंतसेनेला वाटल्यामुळें तिनें मदनिका शर्विलकाच्या स्वाधीन केली आणि त्यांना इष्ट स्थळीं पोचवण्यासाठीं आपली गाडी जोडून आणावयास आज्ञा केली. त्या गाडींत बसून जावयास तें जोडपें निघतें न निघतें, तोंच एक दवंडी पिटण्यांत आली.

"कोतवालाची आज्ञा आहे कीं, आर्यक नामा गोपालपुत्र राजा होणार असें भविष्य कोणा सिद्ध पुरुषानें जाहीर केल्यामुळें पालकराजानें त्याला घोषांतून पकडून आणून मोठ्या बंदोबस्तानें अटकेंत ठेवलें आहे. तरी दर एक अधिकाऱ्यानें आपापल्या स्थानीं अतिशय सावधगिरीनें राहावें."

ही दवंडी ऐकून शर्विलकाचें मन द्विधा झालें. पण शंभर स्त्रियांपेक्षां माझा मित्र मला अधिक आहे, असें तो म्हणाला. वसंतसेनेच्या गाडीवानाला त्यानें विचारलें, ‘ तुला रेभिल धनिकाचें घर माहीत आहे ? ’ गाडीवानानें होय म्हणतांच शर्विलक त्याला म्हणाला, ‘ तर मदनिकेला त्या घरीं घेऊन जा. ’ त्यानें मदनिकेला सांगितलें, ‘ प्रिये, सध्या तूं माझ्या मित्राच्या घरीं जा. मी मागाहून लवकरच येतों. ’ गाडींत बसून मदनिका निघून गेल्यावर शर्विलकानें स्वतःशीं निश्चय केला :

‘ स्वभुजपराक्रमानें विख्यात असे माझे पुष्कळ बांधव आहेत. राजानें अपमान केल्यामुळें चिडलेले त्याचे नोकरहि पुष्कळ आहेत. त्या सर्वांचा एकदम उठाव करून आर्यकाला सोडवतों. राजाचा पराक्रम किती आहे तेंहि पाहातों. ’

असा निश्चय करून तो तेथून निघून गेला.

शर्विलक निघून गेल्यावर मैत्रेय वसंतसेनेच्या घरीं आला. वसंतसेनेला अतिशयच आनंद झाला. दागिने द्यूतांत गमावले, त्यांच्या मोबदल्यांत ही रत्नमाला चारुदत्तानें तुला दिली आहे असें मैत्रेयानें सांगतांच वसंतसेनेला आश्चर्य वाटलें आणि कौतुकानें तिचें हृदय भरून आलें.

**वसंतसेना :**

शाखा सद्गुण जया पालवी विनयाची साजिरी ।
विश्वासाचीं मुळें दयेची छाया पडली खरी ।
निजाचार हा प्रकांड कुसुमें चारित्र्याचीं बरीं ।
उपकारादर फळें मधुर तीं सर्वहि काळीं धरी ।
ऐसा सज्जनरूपविटप हो मिळतां त्याच्यावरी ।
सुहृत्पक्षिगण वास सदा तो आनंदानें करी ॥

त्या रत्नमालेचा बहुमानपूर्वक स्वीकार करून, 'त्या द्यूत-काराला माझा निरोप सांगा, कीं मी तुझ्या दर्शनाकरतां संध्याकाळीं तुजकडे येणार आहें' असें वसंतसेनेनें मैत्रेयाला सांगितलें. मैत्रेय आपल्या घरीं परत गेला.

सायंकाळीं वसंतसेना आपल्या एका चेटीला म्हणाली, 'ही रत्नमाला घे. चल, आपण त्या चारुदत्ताकडे त्याचें मनरंजन करण्याकरितां जाऊं.'

तेवढ्यांत आकाश ढगांनीं भरून आलें, पण वसंतसेना बिलकुल डगमगली नाहीं. 'मेघ येवोत, रात्र पडो, पावसाची संततधार पडो, मी कशाची पर्वा करणार नाहीं आणि कोणच्याहि विघ्नामुळं मागं फिरणार नाहीं.'

दोनतीन दिवसांपूर्वीच्या अनुभवानें वसंतसेना सावध झाली होती. तिनें आपल्याबरोबर एका चेटीला तर घेतलेंच, पण तिच्या-शिवाय विट व सेवक रक्षणासाठीं घेतले आणि अशा लवाजम्यासह ती चारुदत्ताच्या घराकडे जावयास निघाली.

इकडे चारुदत्त आपल्या घरीं वसंतसेनेची वाट पाहात होता. पाऊस जोरानें पडूं लागला. तो पावसाळा नव्हता. पावसाकडे पाहून चारुदत्त म्हणाला, 'हें अकालीं दुर्दिन उद्भवलें.' मोठें वादळ झालें, त्यांत झाडें पडलीं, पण वसंतसेना घाबरली नाहीं. पावसांत भिजत ती चारुदत्ताच्या घरीं आली. चारुदत्तानें तिला कोरडीं वस्त्रें नेसावयास दिलीं.



# वाटे दुर्दैवें ही अबला मृत्युमुखांतचि दिसली

दुसरे दिवशीं सकाळीं चारुदत्त आणि मैत्रेय लवकर उठून बाहेर गेले. जातांना चारुदत्तानें निरोप ठेवून दिला, कीं जागी झाल्यावर वसंतसेनेनें पुष्पकरंडक उद्यानांत यावें. चारुदत्तानें या खेपेस गाडीची व्यवस्था केली होती आणि वर्धमानकाकडेच ती हांकण्याचें काम सोपवण्यांत आलें होतें. सूर्योदयानंतर सावकाशपणें वसंतसेना उठली. तिला ही योजना जेव्हां कळली तेव्हां तिला आनंद झाला. मोठ्या उत्साहानें तिनें वेणीफणी केली, अंगावर दागिने चढवले आणि गाडींत बसून जाण्याकरितां आपल्या खोलींतून ती बाहेर आली. चारुदत्ताचा मुलगा रोहसेन रडत होता आणि रदनिका त्याची कशीतरी समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होती असें तिला दिसलें. तिनें तपास केला, तेव्हां रोहसेनाच्या रडण्याचें कारण तिला समजलें. रोहसेनाला खेळावयास एक मातीची गाडी करून दिलेली होती. (या गाडीवरूनच नाटकाचें नांव 'मृच्छकटिक' असें ठेवलेलें आहे.) शेजारच्या एका मुलाची सोन्याची गाडी पाहून तोहि सोन्याची

गाडी मागूं लागला. चारुदत्ताकडे सोन्याची गाडी कुठून असणार? वसंतसेनेला हें जेव्हां समजलें, तेव्हां तिनें आपल्या अंगावरचे दागिने उतरले आणि त्या मातीच्या गाडींत टाकले. 'तुला हवी तशी गाडी करवून घे' असें त्याला सांगून वसंतसेना तेथून निघाली. वसंतसेनेचे दागिने दुसऱ्यांदां अशा प्रकारें चारुदत्ताच्या घरीं राहिले.

आर्यकाला सोडविण्याची प्रतिज्ञा करून शर्विलक निघाला, तो कामाला लागला. दुसरे दिवशीं रेभिलाच्या व इतरांच्या मदतीनें त्यानें शहरांत गाड्यांची गर्दी करून टाकली. आपले साथीदार ठिकठिकाणीं पसरवून ठेवले. ही सगळी योजना त्यानें इतक्या गुप्तपणें केली, कीं नगरकोतवाल राजशालक संस्थापक म्हणजेच शकार याला तिची कांहीं बातमी लागली नाहीं. तो आपल्या मित्रांसह पुष्पकरंडक उद्यानांत मजा करावयास गेला.

शर्विलकाच्या मदतीनें बंदीखान्यांतून आर्यक बाहेर पडला आणि लपत छपत पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागला. एक बेडी त्यानें तोडली, पण दुसऱ्या पायांत बेडी अडकून राहिली. या गाडी-आड, त्या गाडीआड, असा तो चालला होता. लपत छपत चालत असतां तो चारुदत्ताच्या घराच्या आसपास आला.

वर्धमानकानें चारुदत्ताच्या वाड्याच्या दरवाज्याशीं गाडी आणून उभी केली आणि वसंतसेनेला वर्दी दिली. वसंतसेनेला शोभेल अशी गादी त्या गाडींत नव्हती, तेव्हां ती चारुदत्ताच्या गाडीखान्यांतून आणावयाची आवश्यकता त्याला भासली. त्या जागीं गाडी सोडून जाणें शक्य नव्हतें, कारण ते बैल भलतीकडे



" तुला हवी तशी गाडी करून घे "

गाडी ओढून घेऊन जाण्याची धास्ती होती. म्हणून तो गाडी घेऊनच गादी आणावयास गेला.

त्याच वेळीं शकाराचा स्थावरक चेट शकाराची गाडी घेऊन त्याच रस्त्यानें जात होता. रस्त्यांत गांवठी गाड्यांची खूप गर्दी झाली होती. त्यांतील एक गाडी अडली आणि तिच्या गाडीवानानें मदतीसाठीं विनंती केली. स्थावरकानें आपली गाडी चारुदत्ताच्या दाराशीं उभी केली आणि अडचणींत पडलेल्या आपल्या बांधवाला मदत करावयास तो गेला. इतक्यांत वसंतसेना घराबाहेर आली आणि दारांत उभ्या असलेल्या गाडींत बसली. 'माझा उजवा डोळा कां बरें उडूं लागला ?' असें ती आपल्याशींच बोलली. थोड्याच वेळांत स्थावरक त्या गाडीशीं आला आणि त्यानें गाडी हांकली. त्याला शकारानें गाडी उद्यानाकडे आणावयाचा हुकूम केला होता.

इतक्यांत दवंडी पिटण्यांत आली कीं, 'आर्यक तुरुंगांतून पळाला, तरी राजसेवकांनीं त्याला पकडावें असा हुकूम सरकारनें सोडला आहे.'

थोड्याच वेळांत वर्धमानक आपली गाडी घेऊन त्याच दरवाज्यापाशीं आला. बुरख्याची गाडी पाहून आर्यक गाडींत बसला. त्याच्या बेडीचा आवाज झाला. कोणी तरी माणूस बसलें आणि कांकणासारखा आवाज झाला. वर्धमानकाला वाटलें, कीं वसंतसेना गाडींत बसली. त्यानें गाडी चारुदत्ताच्या उद्यानाकडे हांकली.

आर्यक पळून गेल्याची दवंडी पिटल्यानंतर वीरक नांवाचा जो रक्षकांचा प्रमुख होता, त्यानें चहूंबाजूंनीं नाकेबंदी करण्याची

a11c9112.M4
2680
27/2/67



योजना आंखली. ते रस्ता रोखीत होते, तोंच चारुदत्ताची गाडी रस्त्यानें जातांना दिसली. वीरकानें व त्याच्या हाताखालच्या चंदनकानें गाडीवानाला हटकलें. गाडीवानानें सांगितलें, 'ही गाडी चारुदत्ताची आहे, तिच्यांत बसून वसंतसेना चारुदत्ताला संकेतस्थळीं भेटावयास जात आहे.' चंदनकाचें समाधान झालें, तरी वीरकानें गाडी तपासण्याचा आग्रह धरला, पण तपासण्याचें काम चंदनकासच सांगितलें. गाडीजवळ जाऊन चंदनक बुरखा वर करून पाहातो तों आंत खुद्द आर्यक! चारुदत्ताच्या गाडींतून आर्यक पळून जात होता आणि तोहि फसवून, हें जर राजाला कळलें तर राजा चारुदत्ताला भयंकर शिक्षा केल्याशिवाय राहाणार नाहीं, हें चंदनकाच्या मनांत आलें आणि ती गाडी तशीच जाऊं देण्याचा त्यानें निश्चय केला. आपली तरवार त्यानें आर्यकाला दिली, आणि वीरकाला येऊन सांगितलें कीं, आंत वसंतसेनाच आहे. वीरकाला संशय आला म्हणून तो गाडी स्वतः तपासावयास सरसावला. चंदनकानें त्याला अडवलें आणि दोघांची मारामारी झाली. राजाकडून तुला शासन करवीन अशी धमकी देऊन वीरक तेथून निघून गेला. चंदनकानें गाडीवानाला म्हटलें, 'पाहातोस काय? हांक गाडी जलदी.' वर्धमानकानें जोरानें गाडी हांकली. अशा प्रकारें आर्यक निसटला.

चारुदत्ताची गाडी निघून गेल्यावर चंदनक पाहातो, तों शर्विलक त्याच्या मागेंच होता. त्याला पाहून चंदनकानें स्वतःच्या मनाशीं निश्चय केला :

'वीरक राजाच्या कृपेंतील आहे आणि त्याच्याशीं मीं भांडण केलें. तो माझी दुर्दशा केल्याशिवाय राहाणार नाहीं. तरी

माझा भाऊ, मुलगा वगैरे परिवार घेऊन मी शर्विलकालाच जाऊन मिळतों.'

चारुदत्त आणि मैत्रेय उद्यानांत बसले होते. वर्धमानकास उशीर लागला असें चारुदत्तास वाटूं लागलें आणि त्यानें मैत्रेया-जवळ तसें बोलून दाखवलें. इतक्यांत आर्यक ज्या गाडींत होता ती गाडी घेऊन वर्धमानक आला. मोठ्या उत्सुकतेनें त्या गाडीकडे पाहातो तों त्याला आढळून आलें कीं, गाडींत वसंतसेना नाहीं आणि तिच्या जागीं आर्यक आहे. एकपरी त्याच्या वांट्यास निराशा आली, तरी आर्यकाशीं औदार्यानें वागण्यांत त्यानें कसूर केली नाहीं. त्याची दुसरी बेडी चारुदत्तानें तोडली आणि त्याच गाडींत बसून त्याला आपल्या मित्रपरिवारांत ताबडतोब जावयास सांगितलें. वर्धमानकालाहि 'यांना यांच्या घरीं पोंचव' अशी ताकीद दिली.

आर्यकाची अशा तऱ्हेनें रवानगी केल्यावर चारुदत्तानें प्रथम मैत्रेयाकरवीं ती बेडी एका जुन्यापुराण्या विहिरींत फेंकून देवविली. आपण राजाचा मोठा अपराध केला आहे आणि या उपर बागेंत बसणें धोक्याचें आहे असें तो मैत्रेयाजवळ म्हणाला. वसंतसेनेला पाहावयास तो उत्सुक होता, पण त्याचें मन साशंक होऊं लागलें. त्याचा डावा डोळा उडूं लागला. उद्यानांतून तो बाहेर पडणार, तों त्याला तो भिक्षु म्हणजेच जुना संवाहक व द्यूतकार दिसला. भिक्षुदर्शन अमंगल मानलें जात असे. त्यामुळें चारुदत्त म्हणाला, 'त्याला या वाटेनें जाऊं द्या, आपण पलीकडल्या वाटेनें जाऊं.'

चारुदत्त आणि मैत्रेय दोघेहि निघून गेले.

तो भिक्षु शकाराच्या उद्यानांत छाटी धुण्याकरितां गेला. इतक्यांत शकार आणि त्याचा मित्र विट तेथें आले. शकाराजवळ

तरवार होती. त्यानें त्या भिक्षूला दमदाटी केली, शिव्या दिल्या आणि लाथाबुक्या मारून घालवून दिलें. स्थावरकास आपली गाडी त्या उद्यानांत आणावयास त्यानें सांगितलें होतें. त्याच्या मनांत वसंतसेनेसंबंधीं एकसारखे विचार घोळत असत. शकार विटाला म्हणाला, 'अजूनहि मला वशंतशेनेची आठवण येते. दुर्जनाचें भाषण जशें हृदयांतून जात नाहीं, तशीच वशंतशेना माझ्या हृदयांतून जात नाहीं.'

शकाराचा मित्र विट स्वतः वाईट नव्हता, पण शकाराचा आश्रित होता. स्थावरक अजून गाडी घेऊन कां आला नाहीं, असें शकारानें विटाला विचारलें. दिवस बराच वर आला होता. शकाराला भूक लागली होती आणि चालत जाण्याचें त्याच्या जिवावर आलें होतें.

**शकार :** मित्रा विटा, स्थावरक येईपर्यंत मी थोडेंशें छानदार गातों. मित्रा, कशा गायलों रे मी ?

**विट :** तें काय विचारावें ? आपण केवळ गंधर्व आहां.

**शकार :** अरे, मी गंधर्व कशा नशेन ? पहा—

हिंगू जीरक भद्रमुश्ता । शगुडा शुंठी वचा शुहिता ।
ती म्या शविली गंधयुक्ता । गंधर्व मग मी कशा नव्हे ॥

इतकेंच करून नाहा गायला येत ! आणखी काय केलें शांगू ?

हिंग मिऱ्यांचा लावुनी शुवाश । घृतपाचित करूनि त्याश ।
भक्षिलें म्यां कोकिलांचें मांश । कोकिळश्वर मी कशा नव्हे ?

**शकार :** मित्रा विटा, गाडी आलीशें वाटतें.

**विट :** कशावरून तुला समजलें ?

**शकार :** हा पहा ! म्हाताऱ्या डुकराशारखा चाकांचा घरघर शब्द होत आहे. पुत्रका, श्थावरका चेटा, आलाश ? बरें झालें.

चेट : आलों, सरकार.

शकार : गाडी आली ?

चेट : आली, सरकार.

शकार : बैल आले ?

चेट : आले, धनीसाहेब.

शकार : तूंहि आलाश ?

चेट : हा मी, महाराज, आपल्यापुढंच उभा आहें.

शकार : बरें तर आण गाडी आंत.

चेट : कोणत्या वाटेनं आणू ?

शकार : त्या पडक्या भिंताडावरून आण.

चेट : त्या वाटेनं आणली तर गाडी मोडेल, बैल मरत्याल आणि मीहि मरन महाराज.

शकार : बरं मग ? मी राजाचा मेव्हणा आहें. मला काय कमी आहे ? गाडी मोडली तर दुशरी करीन. बैल मेले तर दुशरे घेईन आणि तूं मेलाश तर दुशरा गाडीवान ठेवीन.

चेट : सरकार, आपलं सगळं ठीक आहे. पण मी गरीब फुकाचा प्राणाला मुकेन, त्याचें काय ?

शकार : कांहीं चिंता नाहीं. त्या पडक्या भिंताडावरूनच गाडी आणली पाहिजे.

चेट : पण महाराज —

शकार : बश्श ! बोलूं नकोश.

करतो काय असला मालक मिळाल्यावर ! कशीतरी स्थावरकानें गाडी त्या जागीं आणली. त्या गाडींत वसंतसेना होती हें त्या बिचाऱ्याला माहीत नव्हतें. आपण या भलत्याच गाडींत आहोंत याचा या क्षणापर्यंत तिलाहि पत्ता नव्हता. तिच्या कानीं स्थावरकाचा आवाज पडला, तेव्हां तिच्या मनांत आलें, ' हा कांहीं

वर्धमानकाचा आवाज नव्हे. न जाणों, चारुदत्तानें दुसरीच गाडी पाठविली असेल. माझें हृदय कांपूं लागलें आहे, दिशा शून्य झाल्या आहेत, उजवा डोळा लवतो आहे आणि सर्व कांहीं विपरीत दिसूं लागलें आहे.'

गाडी दिसल्यावर शकाराला आनंद झाला आणि विटासह तो गाडींत बसावयास सज्ज झाला. गाडीजवळ येऊन पडदा बाजूस सारतो, तों त्याला आंत स्त्री दिसली आणि तो घाबरला.

शकार : अरे मी मेलों रे मेलों! गाडींत कोणी राक्षशी बशली आहे, किंवा कोणी चोर बशला आहे. राक्षशी अशली तर आम्हाला चोरून नेईल. चोर अशला तर आम्हाला खाऊन टाकील. आतां कशें करावें बरें ?

विट : मित्रा, भिऊं नकोस. चेटाची सावली असेल ती.

शकार : पुत्रका चेटा, जिवंत आहेश ना, बाबा ?

चेट : होय महाराज.

शकार : मित्रा विटा, गाडींत कोणी स्त्री बशली आहे, तूं बघ बरें.

विटानें जाऊन पाहिलें, तों आंत वसंतसेना,

विट : अरे अरे ! फार वाईट गोष्ट झाली ! वसंतसेने, काय केलंस हें ?

नेतां पूर्वी आर्जवूनि तुज अवगणना कां कली ।
परि धनलोभें आलिस आतां बुद्धि कशी गे चळली ॥

वसंत० : नाहीं नाहीं. धनलोभामुळें मी आलें नाहीं. गाड्यांची अदलाबदल झाल्यामुळें चुकून मी इकडे आलें आहें. मी तुम्हाला शरण आहें. आतां तुम्हीच माझं रक्षण करा.

वसंतसेनेचें रक्षण करण्यासाठीं आपल्यापरी विट निरनिराळ्या युक्त्या योजून पाहूं लागला. त्या सर्व फसल्या आणि शकारानें

वसंतसेनेला आपल्या गाडींतून सक्तीनें खालीं उतरावयास लावलें. तिच्याशीं तो लाडीगोडी लावूं लागला. पण वसंतसेनेनें त्याला झिडकारलें. तेव्हां तो चिडला आणि तिचा वध करावयाचें त्यानें ठरवलें. प्रथम त्यानें तें काम विटास करावयास सांगितलें, पण विटानें तें नाकारलें. तेव्हां शकारानें स्थावरकास सांगून पाहिलें. त्यानेंहि तें नाकारलें. आतां त्या दोघांनाहि तेथून घालवून देण्याची युक्ति तो योजूं लागला. स्थावरकास त्यानें सांगितलें कीं, गाडी घेऊन घरीं जा आणि माझी वाट पाहा. तो बिचारा निघून गेला. विट तसा जाईना, कारण त्याला शंका येत होती. 'वसंतसेनेला अपाय करणार नाहीं' असें वचन शकारानें विटाला दिलें, तेव्हांच विट तेथून गेला.

दोघांनाहि अशा युक्त्यांनीं दूर केल्यावर शकार वसंतसेनेची पुनः एकदां मनधरणी करूं लागला.

**शकार :** देत असतां बहु कांचन । बोलत असतां प्रियवचन ।
नम्र करितां शवेष्टन । हें मस्तक तुजपुढें ॥
तथापि तूं मजला शुद्ती । इच्छित नाहींस गजगति ।
शेवा करिती तयांप्रती । कष्टविती काय मनुश्यें ॥

**वसंत० :** हा अधमा, चांडाळा ! काय बोलतोस हें ?

दावुनि धनलोभ मला व्यथ भुलविशी । प्राप्त होय शुद्ध काय काय हा तुशीं ॥ ध्रु० ॥ पाहुनि कुलशील नरा आम्हि सेवितों । त्यासंगें सकल काम पूण मानितों । सेवुनियां भ्रमरि खला आम्रविटप तो । आदरि मग नीच पलश सांग ती कशी ॥

**शकार :** अगे बटकीचे पोरी, त्या भिकारड्या चारुदत्ताला आम्रवृक्ष आणि मला पलश म्हणतेश काय ? अशा रीतीनें मला शिव्या देतेश ?

वसंत० : तो निरंतर माझ्या हृदयांत वास करीत आहे, मग त्याचें स्मरण करूं नको तर कोणाचें करूं ?

शकार : अजून तो तुझ्या हृदयांत आहे का ? तर त्याला आणि तुला एकदमच मोक्ष देतों.

वसंत० : अग आई, तूं कुठें आहेस ? हे आर्यपुत्रा चारुदत्ता, मनोरथ पूर्ण न होतां आज माझे प्राण जाणार ना ? आतां मी काय करूं ? मोठ्यानं ओरडूं का ? छे ग बाई ! तेंहि नीट दिसत नाहीं. वसंतसेना मोठ्यानं ओरडते असें लोक म्हणतील. आर्या चारुदत्ता, हा मी तुला शेवटचा प्रणाम करतें.

शकार : पुनः त्याचें नांव घेतेश ?

शकार चिडला आणि त्यानें वसंतसेनेचा गळा दाबला. ती मेली असें समजून तो स्वतःचें अभिनंदन करूं लागला, इतक्यांत विट तेथें आला. दरम्यानच्या वेळांत तो बागत इकडे तिकडे हिंडत होता, तेव्हां त्याला एका प्रचंड झाडाखालीं झांकलें गेलेलें एक स्त्रीचें कलेवर दिसलें होतें. रात्रीं जें भयंकर वादळ झालें होतें त्यांत हा वृक्ष पडला होता आणि झाडाखालीं झोपलेली स्त्री मेली होती, तिचें हें कलेवर होतें. त्याला हें दुश्चिन्ह वाटलें आणि चिंताक्रांत मनानेंच तो शकार होता तेथें येऊन पोंचला. आल्याबरोबर त्यानें प्रश्न केला, 'वसंतसेना कुठें आहे ?' शकारानें उत्तर दिलें 'ती गेली !' विटाला शकार बनवूं लागला, पण विट कांहीं बनेना. तो खोदखोदून विचारूं लागला, तेव्हां अखेरीस 'मीं तिला मारली' असें शकारानें सांगितलें आणि मरणाच्या दारीं पडलेल्या वसंतसेनेचा देह त्याला दाखवला. विटाला अतिशय वाईट वाटलें.

शकार हें दुष्कर्म आपल्यावर घालील अशी भीति विटाला वाटली आणि त्यानें तेथून निघून जाण्याचें ठरवलें. 'नीचा, पुरे

तुझी संगत. जातों मी' असें म्हणून विट जावयास निघाला, तेव्हां खरोखरच शकारानें वसंतसेनेचा वध केल्याचा आरोप त्याच्यावर केला. पण विटानें तरवार उपसतांच शकार घाबरला आणि विट निघून गेला.

विट : जेथें आर्य शर्विलक चंदनक प्रभृति आपले सोबती आहेत तेथें जावें.

विट गेल्यानंतर शकारानें पुष्कळसा पालापाचोळा जमा केला आणि त्याच्याखालीं वसंतसेनेचा सबंध देह झांकून टाकला. उद्देश हा, कीं चटकन् वा सहजासहजीं तिचें प्रेत कोणाच्या नजरेस पडूं नये.

शकार क्षणभर विचार करीत उभा राहिला. वसंतसेनेला मारून सर्व काम उरकत नव्हतें. तिच्या मृत्यूची बातमी केव्हांना केव्हां तरी लोकांपर्यंत पोंचेल आणि तिच्या मारेकऱ्याचा तपास करण्याची मागणी करण्यांत येईल, याची त्याला जाणीव होती. वसंतसेनेचा वध चारुदत्ताच्या माथीं मारतां आल्यास स्वतःचा बचाव करून चारुदत्तावरहि सूड उगवल्यासारखें होणार होतें. या सर्व गोष्टींचा विचार करून त्यानें ठरविलें कीं, 'धनलोभास्तव चारुदत्तानें संतसेनेचा वध माझ्या पुष्पकरंडक उद्यानांत केला अशी फिर्याद न्यायाधीशापुढें करावी.' हा विचार ठाम करून तो उद्यानांतून निघून गेला.

शकार निघून गेल्यानंतर थोड्याच वेळांत तो भिक्षु तेथें पुनश्च आला आणि आपले धुतलेले कपडे वाळत घालण्यासाठीं योग्य जागा शोधूं लागला. वसंतसेनेच्या अंगावरचा पाल्याचा ढीग त्याच्या नजरेस पडला आणि ती जागा त्याला योग्य वाटली.

त्यानें आपले ओले कपडे त्यावर पसरले. थोडया वेळांत त्याला कांहीं तरी हालल्याचा भास झाला, आणखी कांहीं वेळानें त्याला सुस्कारा ऐकूं आल्यासारखें वाटलें. म्हणून तो जवळ गेला आणि त्यानें आपले कपडे गोळा केले. त्या वेळीं त्याला स्त्रीचा हात दिसला. त्यानें सर्व पाला बाजूस केला आणि पाहातो तों वसंतसेना! कृतज्ञतेनें त्याचें हृदय भरून आलें आणि त्यानें तिला सावध केलें. तिला तो वारा घालूं लागला.

वसंत० : आर्या, तूं कोण आहेस ?

भिक्षु : उपासिके, दहा मोहरा देऊन तूं विकत घेतलास तोच मी.

वसंत० : आतां तुम्हांला मीं ओळखलें.

भिक्षु : तुझी अशी अवस्था कां झाली ?

वसंत० : वेश्यापणाला योग्य तेंच झालें.

भिक्षु : बरं, तूं आतां ऊठ. या जवळच्या फांदीला धरून ऊठ.

वसंत० : या समयीं तुम्हीं मला जीवदान दिलें असें मी समजतें.

भिक्षु : जवळच तो मठ दिसतो आहे त्यांत माझी धर्मभगिनी रहाते, तेथपर्यंत हळुहळू चल. मग आपल्या घरीं जा.

भिक्षु वसंतसेनेला घेऊन त्या मठांत गेला.

★



# अधम किति पातका असशि भूपा

शकार बागेंतून घरीं गेला. प्रथम त्यानें स्थावरकाला आज्ञाभंगाबद्दल चोप दिला आणि घरांत कोंडून ठेवलें. नंतर स्नान करून जेवण उरकलें, आणि शक्य तितक्या लवकर न्यायालयाचा रस्ता धरला. न्यायाधीश नुकतेच येऊन बसले होते आणि शोधनक कोणी फिर्यादी आहे काय, हें पाहावयास बाहेर आला होता. त्याच्या दृष्टीस राजशालक शकार पडला. त्याला कांहीं तो शुभ प्रसंग वाटला नाहीं. त्यानें आंत जाऊन शकार आल्याचें न्यायाधीशांना कळविलें. न्याया-धीशांच्या मनांतून त्याची फिर्याद लांबणीवर टाकण्याचें होतें, पण शकारानें राजाकडे जाऊन नव्या न्यायाधीशाची नेमणूक करतों अशी धमकी घातली. तेव्हां न्यायाधीशांनीं त्याची फिर्याद त्याच-वेळीं ऐकावयाचा निर्णय घेतला.

न्यायालयांत न्यायाधीश बसले होते. इतर अधिकारीहि आपापल्या जागेवर बसले होते. शकार आंत शिरला आणि त्यानें आपली

फिर्याद नोंदविली. 'माझ्या पुष्पकरंडक उद्यानांत या नगरीचें भूषण अशी जी वसंतसेना तिला कोणी कुपुत्रानें धनलोभास्तव बाहुपाशांनीं मुद्दाम मारलें' असें शकारानें सांगितलें. एवढें निवेदन ऐकल्यावर शिरस्तेदाराच्या सूचनेवरून न्यायाधीशांनीं वसंतसेनेच्या आईला पाचारण केलें. आई आली ती चिंताग्रस्त मनानेंच आली. वसंतसेना चारुदत्ताकडे गेली, यापुढील कांहींच माहिती तिला नव्हती.

न्याया० : म्हातारे, तूं वसंतसेनेची आई का ?

आई : होय महाराज.

न्याया० : बरें, या वेळेस तुझी मुलगी कुठें आहे ?

आई : ती आपल्या मित्राच्या घरीं गेली आहे.

न्याया० : तिच्या मित्राचें नांव काय ?

आई : हें लोकांनीं विचारावें, आपल्यासारख्यांनीं नव्हे.

न्याया० : हें न्यायाचें काम आहे म्हणून विचारणें प्राप्त झालें.

आई : विनयदत्तशेटचा नातू, सागरदत्तशेटचा मुलगा, श्रेष्ठ चारुदत्त, त्याच्याकडे माझी मुलगी गेली आहे.

शकार : आतां चारुदत्तावर माझी फिर्याद आहे.

न्याया० : हा खटला चारुदत्तावर जातो यांत संशय नाहीं. आतां चारुदत्ताला बोलवून आणलें पाहिजे. शोधनका, त्या चारुदत्ताकडे जा आणि कांहीं कारणाकरितां न्यायाधीश आपल्या दर्शनाची इच्छा करताहेत, तर तेथपर्यंत एकवार चलावें असें सांगून, घाई न करतां त्याच्या छंदाप्रमाणें सत्कारपूर्वक त्याला घेऊन ये.

न्यायाधीशाकडून बोलावणें आल्याचें समजतांच चारुदत्ताच्या मनांत विचार येऊं लागले. 'माझें कुलशील माहीत असून आज ज्याअर्थीं न्यायाधीशाकडून मला बोलावण्यांत आलें आहे, त्याअर्थीं

लक्षण ठीक दिसत नाहीं. आर्यकाला बंधमुक्त करून माझ्या गाडींतून मीं पाठवून दिलें ही गोष्ट राजाच्या कानापर्यंत पोंचल्यामुळें तर हें बोलावणें आलें नाहीं ?' असा विचार करीत करीत चारुदत्तानें न्यायालयांत प्रवेश केला. चारुदत्ताला न्यायाधीशानें बसावयास मोठ्या आदरानें आसन दिलें, हें पाहून शकार खूप चिडला. न्यायाधीशांनीं 'वसंतसेनेशीं आपली मैत्री आहे का?' असा प्रश्न विचारला आणि चारुदत्तानें त्याचें 'हो' असें उत्तर दिल्यावर 'आतां वसंतसेना कोठें आहे?' असा दुसरा प्रश्न विचारला. याच वेळीं शकार एकदम ओरडला, 'अरे स्त्रीघातक्या, सोन्यामोत्यांच्या अलंकारांनीं भूषित अशी जी वसंतसेना तिला मारून, वर साधुपणाचा डौल मिरवतोस काय?' वसंतसेना मेल्याची बातमी चारुदत्ताच्या कानावर प्रथमच आली. वसंतसेना आपल्या घरीं गेली असा जबाब चारुदत्तानें न्यायाधीशास दिला.

न्याया० : ती घरीं कशी गेली, केव्हां गेली व बरोबर कोण होतें तें सांगा.

चारु० : ( विचार करतो ) ती का लपूनछपून गेली असं सांगूं?

न्याया० : आर्या, सांगा, सांगा, लौकर.

चारु० : घरीं गेली इतकें मला माहीत आहे. याहून मला कांहीं माहीत नाहीं.

शकार : माझ्या पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत नेऊन, धनलोभास्तव बाहुपाशांनीं तिला मारून, आतां ती घरीं गेली असें म्हणतोश काय?

न्याया० : आर्या, ती पायांनीं गेली कीं गाडींत गेली?

चारु० : खरें विचाराल तर माझ्या देखत कांहीं गेली नाहीं, मग ती कशी गेली हें मी काय सांगूं?

इतक्यांत वीरक न्यायालयांत आला आणि चंदनकाविरुद्ध त्यानें फिर्याद नोंदवली. ज्या गाडीवरून वीरक–चंदनकांची मारामारी झाली ती कोणाची होती असें न्यायाधीशांनीं विचारलें.

वीरक : त्या गाडीवाल्यास विचारलें त्यावर तो म्हणाला, 'ही गाडी चारुदत्ताची असून आंत वसंतसेना बसली आहे आणि पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत क्रीडा करण्याकरितां चालली आहे.'

न्याया० : वीरका, तुझा न्याय मागाहून पाहूं. अगोदर, बाहेर दरवाज्यापुढें घोडा तयार आहे, त्यावर बसून पुष्पकरंडक जीर्णोद्यानांत जा आणि तेथें एखादें स्त्रीचें प्रेत पडलें आहे कीं काय हें पाहून ये.

हुकमाप्रमाणें जाऊन, पाहून, वीरक परत आला.

वीरक : महाराज, तेथें एक स्त्रीचें प्रेत पडलें आहे, परंतु कोल्ह्याकुत्र्यांनीं खाल्ल्यामुळें अमकीचेंच असें म्हणतां येत नाहीं.

न्याया० : बरें, पण तें प्रेत स्त्रीचेंच असें तूं कशावरून म्हणतोस ?

वीरक : तिचे केश आणि हातपाय तुटून पडले आहेत यावरून मी म्हणतों.

न्याया० : शिव शिव ! लोकांच्या दुर्वर्तनास धिक्कार असो !

शकार : काय हो, अद्यापि तुम्ही पक्षपातानें न्याय चालवतां. हा चारुदत्त धडधडीत दोशी असून त्याला तुम्ही आशनावर बशूं देतां काय ?

न्याया० : शोधनका, चारुदत्ताला आसनावरून उठव.

शकार : वाहवा ! आतां ज्या आशनावर चारुदत्त बशला होता त्यावर मी बशतों.

इतक्यांत तेथें मैत्रेय आला. त्याच्या बगलेंत दागिन्यांची गांठोडी होती. त्याला चारुदत्तावर केलेल्या आरोपाची माहिती मिळाली आणि फिर्यादी शकार आहे हें कळलें, तेव्हां तो चिडला आणि काठी उगारून शकाराला मारायला तो धावला. हात वर केल्याबरोबर बगलेंतील गांठोडी खालीं पडली. शकाराला हेंच हवें होतें. त्यानें लगेच ती गांठोडी उचलली आणि न्यायाधीशांपुढें ठेवून म्हणाला, 'हेच त्या बिचाऱ्या गणिकेचे अलंकार चारुदत्तानें आपल्या सोबत्यापाशीं दिले होते.'

न्याया० : बाई, हे दागिने कोणाचे ?

आई : महाराज, कारागिराची कुशलता पाहून भ्रांति पडते, पण माझ्या मुलीचे दागिने हे नव्हेत.

न्याया० : चारुदत्ता, हे दागिने तुझे आहेत काय ?

चारु० : नाहीं, येथें जी वृद्धा बसली आहे तिच्या मुलीचे.

न्याया० : तर ते तुझ्याकडे कसे आले ?

चारु० : माझ्या घरून जाते वेळीं वसंतसेनेनें माझ्या मुलाला सोन्याची गाडी करण्याकरतां हे दिले होते.

न्याया० : आर्या, खरें असेल तेंच सांगा.

शकार : तिला प्रथम पुष्पकरंडक उद्यानांत नेऊन तिला मारून तिच्या अंगावरचे दागिने घेतलेश आणि आतां असें शांगतोश ?

न्याया० : आर्या चारुदत्ता, खरें सांग. जर तूं खरें न बोलशील तर निरुपायास्तव खरें बोलण्यासाठीं तुला कडक शिक्षा करावी लागेल.

चारु० : महाराज, होणारापुढें इलाज नाहीं. मीं तर पाप मुळींच केलें नाहीं. आतां तुम्ही बलात्कारानें माझ्या अंगीं लावतां, तर माझा काय उपाय आहे ? आतां वसंतसेनेशिवाय मला तरी जगून काय करायचें आहे ?


न्याया० : दूतांनो, धरा या चारुदत्ताला आणि बांधा.

शकार : मला जें करायचें तें मीं आपल्याशारखें केलें.

न्याया० : आर्या चारुदत्ता, हा राजाच्या घरचा व्यवहार आहे. न्याय करणें आम्हांकडे आहे. तरी शोधनका, पालकराजाला असें सांग कीं, मनूच्या वचनाप्रमाणें ब्राह्मण वध्य असला तरी त्याला मारूं नये, आमच्या मतें त्याला हद्दपार करावा.

शोध० : महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें कळविलें. परंतु महाराजांनीं अशी आज्ञा केली कीं, द्रव्यलोभास्तव ज्यानें स्त्री मारली तो जरी ब्राह्मण असला तरी त्याची धिंड काढून त्यानें वसंतसेनेला ज्या ठिकाणीं मारली त्या ठिकाणीं मार देऊन, दक्षिण स्मशानांत सुळीं द्यावा अथवा त्याचा शिरच्छेद करावा. जो कोणी असा अपराध करील त्याला याप्रमाणेंच शासन होईल अशी ताकीद करावी.

न्याया० : शोधनका, आरोपीस दूर ने आणि मांगास आज्ञा दे, कीं याला घेऊन जाऊन राजाज्ञेप्रमाणें करा.



चारुदत्त : महाराज, होणारापुढें इलाज नाहीं. मी तर पाप मुळींच केलें नाहीं.

शोध० : श्रेष्ठा चारुदत्ता, ये असा इकडून.

चारु० : अधम किति पालका असासि भूपा ।
न्यायपथ सोडिसी पापकूपा । ध्रु० ॥
सत्त्व घ्यावें असें चित्तिं होतें तरी ।
वन्हि, विष, जल, तुला यांहिं अथवा ।
कंठ माझा तुवां कापुनी करवतीं ।
शांतवाया मना प्राण घ्यावा ॥
टाकुनी मार्ग हा शत्रुवचनें कसें ।
मारिसी मज असें ब्राह्मणाला ।
पुत्रपौत्रांसवें नरकिं जाशील रे ।
हाचि माझा असो शाप तुजला ॥



# अशुभचि शुभ झालें

राजाज्ञेप्रमाणें दोन मांगांनीं चारुदत्तास वधाच्या जागेकडे चालविलें. चारुदत्ताला तांबड्या रंगाचे कपडे घालावयास लावले आणि त्याच्या सबंध अंगभर रक्तचंदनाचा लेप लावला. यज्ञाच्या वेदीवर बळी द्यावयाच्या वेळीं पशूला जसा सजवितात तसें त्याला सजविलें. चारुदत्ताची रस्त्यांतून धिंड काढावी आणि नाक्यानाक्यावर थाळी पिटून त्यानें धनलोभास्तव वसंतसेनेस मारिलें म्हणून राजानें चारुदत्ताला मृत्यूची शिक्षा दिली आणि ती अंमलांत आणण्यासाठीं त्याला वधस्तंभाकडे नेण्यांत येत आहे, अशी दवंडी पिटावी अशी मांगांना आज्ञा करण्यांत आली होती. त्या आज्ञेची ते मांग अंमलबजावणी करीत होते. मांगांना तें काम आवडत नव्हतें. त्या दोन मांगांपैकीं एकतर चारुदत्ताबद्दल आपलेपणा बाळगणारा होता. चारुदत्ताची ती धिंड पाहावयास दुतर्फा गर्दी जमली होती. त्या गर्दींतील लोकांनासुद्धां चारुदत्त खुनी आहे असें वाटत होतें

असें नाहीं, पण ते भीतीनें गांगरून गेले होते. आपल्या उसाशांनीं ते आपलें दुःख व्यक्त करीत होते.

चांडाळ : लोकहो, पहातां काय ? तुम्हांला माहीत नाहीं का !

इंद्रधनू आणि गोप्रसूती । नक्षत्राची अधोगती ।
सत्पुरुषांची प्राणविपत्ती । पाहूं नयेत हीं चार ॥

पौरहो, गर्दी मोडा. गुणांचा समुद्र, दुःखसागर पार जाण्याचा सेतु, संपूर्ण नगराचें भूषण, त्या श्रेष्ठ चारुदत्ताला अशा विपत्तींत काय पहातां ?

रस्त्यावर दुतर्फा लोक जमा झाले होतेच, त्याशिवाय सौधांवरून व गवाक्षांतून स्त्रियाहि पाहात होत्या. त्यांपैकीं सर्वांना चारुदत्ताबद्दल सहानुभूति वाटत होती. त्यांना दुःख होत होतें. आनंद वाटणारा एकच मनुष्य होता आणि तो म्हणजे खरा खुनी शकार. आपलें कारस्थान किती पूर्णपणें यशस्वी झालें आणि आपण केलेल्या खुनाचें प्रायश्चित्त चारुदत्तास कसें भोगावें लागत आहे हें पाहून तो फारच आनंदित झाला होता. त्याला चारुदत्ताचे धिंडवडे आपल्या डोळ्यांनीं पाहाण्याची इच्छा झाली आणि तो येऊन त्या राजसेवक चांडाळांबरोबर चालूं लागला.

चारुदत्ताची शेवटची भेट घेण्यासाठीं त्याच्या मुलाला—रोहसेनाला घेऊन मैत्रेय त्या रस्त्यावर आला. चांडाळांनीं चारुदत्ताला आपल्या मुलाची भेट घेण्यास परवानगी दिली. चारुदत्तानें मुलाला जवळ घेतलें आणि आपलें यज्ञोपवीत त्याला दिलें. माझ्या बाबांना कुठें नेतां असें रोहसेनानें चांडाळांना विचारलें. उत्तर चारुदत्तानें दिलें :

ग्रंथ संग्रहालय,
८६३३९
बालवाङ्मय
२८८०
२१/२/६९



माझ्या बाबांना कुठें नेतां ?

क्र. ८५०२
बा. वा.

चारु० : वत्सा, मी सांगतों.

बाळा घालोनिया गळां । रक्तसुमनांच्या माळा ।
स्कंधावरी स्थापियला । लोहशूल हा ॥
ऐस वत्सा नेति मला । कंठ माझा चिरायाला ।
यज्ञकालिं जैसें पशुला । नेति ओढुनी ॥

रोह० : होय रे चांडाळांनो ?

चांडाळ : आम्ही जातीनें मात्र चांडाळ, कृतीनें नव्हे. जे दुष्ट साधूंचा छळ करतात ते खरे चांडाळ.

रोह० : मग माझ्या बाबांना कां मारायला नेतां ?

चांडाळ : लेंकरा, आम्ही नाहीं मारीत, राजाज्ञा मारते.

रोह० : तर तुम्ही मला मारा, माझ्या बाबांना सोडून द्या.

चांडाळ : बाळ, तूं चिरकाल जग, तुला ईश्वर दीर्घायु करो.

मैत्रेय : बरें तर, चांडाळांनो, मला मारा आणि माझ्या मित्राला सोडा.

थोड्या वेळानें शकारहि त्या चांडाळांना म्हणूं लागला, 'याला आणि पोराला एकदम मारून टाका.' हें ऐकून चारुदत्त घाबरला.

चारु० :

नीच असे खल हा मोठा कपटी बोलतो तें, करिल सारें ॥ ध्रु० ॥
बाळा जाउनि काननभागीं मुनिंच्या आश्रमिं राहें, जननीसंगें ।
क्षणही राहुं नको ऐशा नगरामाजीं लाडक्यारे, सुख न लागे ।
तुजला काळमुखीं देतिल वैरी मग तो तारणारा, कवण सांगें ।
मित्रा तूंहि जारे ॥

मैत्रेय आणि रोहसेन गेले. वधाची जागा आली आणि वधाची वेळहि झाली. दोघांपैकीं कोणताहि चांडाळ चारुदत्तास मारावयास खूष नव्हता.

एक चांडाळ : अरे, आजची पाळी तुझी.

दु० चांडाळ : नाहीं, तुझीच.

प० चां० : बरें तर ; मला दोन घटका थांबलें पाहिजे. कारण माझा बाप मरते वेळीं मला म्हणाला कीं, ज्या वेळेस तुझ्यावर वध करण्याची पाळी येईल त्या वेळीं तूं एकदम वध करूं नको.

दु० चांडाळ : कां बरें ?

प० चांडाळ : कारण कोणी साधुपुरुष द्रव्य देऊन वध्यास सोडवतो किंवा राजास पुत्र झाला तर वध्य मुक्त होतो. मत्त हत्ती उधळला आणि वधस्तंभाजवळ आला तर वध्य सुटतो. अथवा राज्याची उलथापालथ झाली तर सर्वच बंदिवान् मुक्त होतात.

शकार : काय राज्याची उलथापालथ ? तर चारुदत्ताला लवकर मारा.

वधस्थानीं चारुदत्ताला उभें करण्यांत आलें आणि चांडाळानें त्याचा शिरच्छेद करण्याकरितां तरवार उगारली, पण ती त्याच्या हातांतून खालीं पडली. हें पाहून तो चांडाळ म्हणाला, 'इतकी घट्ट धरली असून ज्याअर्थी तरवार गळाली त्याअर्थी चारुदत्ताचें मरण टळलें असेंच वाटतें ! हे भगवति सह्याचलवासिनि देवि रेणुके, जर कृपा करून या चारुदत्ताचा प्राण वांचवलास तर आमच्या चांडालकुलावर अनुग्रह केल्याप्रमाणें होईल.'

जोडीचा चांडाळ म्हणाला कीं, 'आपणांस राजाज्ञेप्रमाणें केलें पाहिजे. आतां आपण याला सुळावर चढवूं.' असें तो म्हणतो इतक्यांत वसंतसेना त्या स्थळीं धापा टाकीत येऊन पोंचली आणि चारुदत्ताच्या अंगावर पडली. सर्वांना विस्मय वाटला. चांडाळांना सर्वांत अधिक आनंद झाला. आतां शकार कोठें आहे याचा ते तपास करूं लागले. भिक्षु वसंतसेनेच्या मागोमाग आला. चारुदत्त व वसंतसेना एकमेकांचें शंकासमाधान करण्यांत गुंतलेलीं असतांनाच शर्विलकहि तेथें येऊन पोंचला.

शर्विलकानें पालकाचा वध करून आर्यकाला सिंहासनावर बसविलें होतें आणि चारुदत्ताला सोडवण्याकरतां तो त्या ठिकाणीं आला होता. त्याला वसंतसेना त्या ठिकाणीं दिसली आणि चारुदत्त संकटमुक्त झाल्याचें आढळून आलें. तो पुढें झाला आणि चारुदत्ताच्या पायां पडला. चारुदत्तानें त्याला चोरीबद्दल उदार मनानें क्षमा केली. नंतर शर्विलकानें चारुदत्तास सांगितलें कीं, आर्यक राजपदावर बसला आहे आणि कुशावतीनगरीचें स्वामित्व चारुदत्तास दिलें आहे. 'आणा त्या पापी राष्ट्रियाला धरून' असा शर्विलकानें हुकूम करतांच लोकांनीं शकारास पकडून उभें केलें. आपल्या प्राणांसाठीं चारुदत्ताच्या चरणांवर शकारानें आपलें मस्तक ठेवलें. चारुदत्तानें त्याला क्षमा केली आणि त्याला सोडून देण्याची शर्विलकास विनंती केली. शर्विलकानें नाइलाज म्हणून शकारास सोडून दिलें.

चारुदत्ताची पत्नी धूता आपल्या वाड्यांत सती जाण्याची तयारी करीत होती. चारुदत्ताच्या अवसानाची बातमी कानीं पडावयाच्या अगोदर सौभाग्यवती असतांना इहलोक सोडण्याची तिची इच्छा होती. वेळींच ती बातमी चारुदत्तापर्यंत पोंचली आणि चारुदत्त, वसंतसेना, शर्विलक वगैरे सर्व मंडळी धावत धावत चारुदत्ताच्या वाड्याकडे गेली. पति समोर दिसल्यावर धूतेला अग्नींत उडी घेण्याचें कारण राहिलें नाहीं. सर्वांना आनंद झाला. धूतेनें वसंतसेनेला आपली धाकटी बहीण मानून जवळ घेतलें.

चारुदत्त : कशी दैवाची चित्रकथा अशुभचि शुभ झालें ।

IRBK-0108502

# संस्कृत नाटकांच्या मराठी गोष्टी

संस्कृत भाषा म्हणजे आर्य संस्कृतीची रत्नमंजूषाच. वेद, उपनिषदें, धर्म, ह्यांतील ह्याच संस्कृतीच्या जोरावर ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास आदि संतांनीं बुडत्या महाराष्ट्रास व भारतास सांवरलें ; ह्याच सस्कृतीच्या साहाय्यानें टिळक, सावरकर, गांधी इत्यादि नेत्यांनीं भारताचें पुनरुत्थान घडवून आणलें. हीच संस्कृति भारताला संघटित, समृद्ध व संपन्न करणार आहे, असा पंडितजींचा विश्वास आहे. म्हणून ही संस्कृति अंगीं मुरवून घेऊन भारताच्या पुनर्घटनेचें कार्य भारताच्या नागरिकांनीं केलें पाहिजे.

ह्या कार्याचा एक लहान व मनोरंजक उपक्रम म्हणून ही संस्कृत नाटकांच्या मराठी गोष्टींची योजना.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

## संस्कृत कवींचीं नाट्यकथानकें

लेखक – नी. शं. खरे

प्रतिमा, मालविकाग्निमित्र, नागानंद, रत्नावलि, मालतीमाधव, ह्यांच्या गोष्टी

मूल्य रु. १.५०

## हरवलेली अंगठी

लेखक – रा. स. जोशी

कविकुलगुरु कालिदासाच्या ‘ शाकुंतल ’ नाटकाची गोष्ट

मूल्य ५० नये पैसे

## मालती – माधव

लेखक – म. का. कारखानीस

भवभूतिकृत ‘ मालती – माधव ’ नाटकाची रोमांचकारी गोष्ट

मूल्य ३७ नये पैसे

## चतुर प्रधान व गुणी राजा

लेखक – म. का. कारखानीस

भासकवीच्या स्वप्नवासवदत्ता नाटकाची रहस्यपूर्ण कथा

मूल्य ३७ नये पैसे

# हे प्रभो विभो अगाध किती तव करणी . . .

कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या ह्या पद्यचरणांतील सत्याची प्रचीति तुम्हांला 'वधू-परीक्षा' ह्या नाटकाची गोष्ट वाचून येईल. पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळांत हें पद महाराष्ट्रांत ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें होतें. हें गाणें चालीवर घोळून म्हणणारा एक खेडवळ गाडीवान एकदा कै. कोल्हटकरांचे शिष्य श्री. वि. स. खांडेकर ह्यांना आढळला होता म्हणे.

तें युगच कोल्हटकरांचें होतें. 'महाराष्ट्रगीत' त्यांनीं रचलें. सुदाम्याचे पोहे मुठीच्या मुठी भरून त्यांनीं वाचकांना दिले, मराठी भाषेला नवें वळण लावलें. त्यांनीं नाटकेंही लिहिलीं व तीं सर्व यशस्वी झालीं. अशा ह्या चतुरस्र मराठी लेखकाच्या एका उत्कृष्ट नाटकाची गोष्ट श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर ह्या नाट्यरसिकाग्रणींनीं सांगितली आहे ती तुम्हांला आवडेलच.

नव्या पिढीला, विशेषतः प्रौढ मुलांना जुन्या नाटकांच्या संविधानकांची व त्यांतील नाट्याची ओळख व्हावी म्हणूनच ह्या मालेची योजना.

# नाटकांच्या गोष्टी

## १ सौभद्र

अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांच्या 'सौभद्र' नाटकाची गोष्ट

## २ शारदा

गोविंद बल्लाळ देवल ह्यांच्या 'शारदा' नाटकाची गोष्ट

## ३ मूकनायक

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या 'मूकनायक' नाटकाची गोष्ट

## ४ भाऊबंदकी

काकासाहेब खाडिलकर ह्यांच्या 'भाऊबंदकी' नाटकाची गोष्ट

## ५ वधूपरीक्षा

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या 'वधूपरीक्षा' नाटकाची गोष्ट

मूल्य प्रत्येकीं ५० नये पैसे

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव मुंबई